CMYK

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ अंक : २६+२७ सोमवार दि. २८ जून २०२१ ते रविवार दि. ०४ जुलै २०२१ पाने : ४ किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## मेव्हणीच्या नादाला लागून अखेर टेलर बरबाद झाला बायको मुलांसह पाच जणांना ठार मारून स्वतःही मेला

नागपूर/ललीतकुमार खरे

चांगल्या माणसाचे एकदा का दिवस फिरले आणि साडेसाती मागे लागली कि होत्याचे नव्हते व्हायला वेळ लागत नाही आणि जेंव्हा आपल्या हातातले सारे काही गेले आता जगून काय फायदा असा विचार माणसाच्या मनात येतो, तेंव्हा तो इतका माथेफिरू बनतो कि ज्याच्यामुळे त्याच्यावर वाईट वेळ आलेली असते त्याला तर तो संपवतोच, पण त्याच्या बरोबर आपलेही जीवन संपवतो. नागपूरमध्ये राहणाऱ्या चंदू माटुरकर या टेलरच्या बाबतीत तसेच झाले. चंदूचा टेलरींगचा व्यवसाय खूप चांगला चालला होता. त्याच्याकडे पैसा आला होता. त्या पैशावर त्याने रेडिमेंट कपड्याचे दुकान थाटले. बँकेचे कर्ज काढून ५० लाखांचा फ्लॅट घेतला. पण हाती पैसा आला कि माणसाचा पाय घसरतो. हाती पैसा असलेल्या चंदुला त्याची मेव्हणी चिटकली आणि त्यांचे प्रेमप्रकरण सुरु झाले. त्यामुळे चंदुला पत्नी आणि मुलांचाही विसर पडला. मात्र पैसा हाती येताच हवेत भरारी घेणाऱ्या चंदुला नियतीनेच जमिनीवर आपटले.

चंदुच्या दुकानाला आग लागली आणि सर्व काही जाळून खाक झाले. हा त्याच्यासाठी मोठा धक्का होता. मात्र या धक्क्यातून सावरण्याआधीच अगोदर त्याच्या सोबत असलेली मेव्हणी दुसऱ्याला लागू झाली. त्यामुळे चंदूच्या मनावर भयंकर परिणाम झाला. ज्या मेव्हणीवर आपण पैसा उडवला तिने दगा दिल्याचे पाहताच चंदूची मानसिक स्थिती बिघडली. या सगळ्याला आपली मेव्हणीच कारणीभूत आहे असे त्याला वाटू लागले. त्यामुळे त्याच्यात सैतान संचारला आणि त्याने एकेदिवशी आपली मेव्हणी, सासू, पत्नी आणि दोन मुलांना ठार मारून स्वतःही आत्महत्या केली. या भयंकर घटनेने संपूर्ण महाराष्ट्र



हादरून गेला. या कुटुंबात केवळ चंदूचा सासरा कामाला गेलेला असल्याने वाचला. परिस्थिती समोर हताश होऊन निराशेने ग्रासलेला माणूस काय करू शकतो याचे हे भयंकर उदाहरण आहे. गाठीशी दोन पैसे शिल्लक असल्यामुळे चंदुने ...पान २ वर

## फेसबुकवरच्या मित्राच्या जाळ्यात चुकून फसली महिला पोलीस अधिकारी अब्रू गमाऊन बसली


मुंबई/क्राईम रिपोर्टर

समाजासाठी मदतगार आणि मार्गदर्शक ठरू शकणारा सोशल मिडिया हा एक जनतेसाठी चांगला आणि दिशादर्शक प्लॅटफार्म आहे. पण दुर्दैवाने त्याचा सध्या मोठ्या प्रमाणावर दुरुपयोग होत आहे. कारण काही गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांनी सोशल मिडीयाला पैसे कमावण्याचे माध्यम बनवले आहे. सोशल मिडीयावरील फेसबुक वर बनावट खाते उघडून महिलांना मैत्रीच्या जाळ्यात ओढायचे आणि त्यांचे आर्थिक आणि लैंगिक शोषण करायचे. हा धंदा सध्या सुरु आहे आणि गुन्हेगार इतके निर्ढावले आहेत कि आता पोलीस खात्यातील लोकांनाही फसवण्या इतपत त्यांचे धाडस वाढले आहे. अशाच एका भामट्याने चक्क फेसबुकवर पोलीस अधिकारी असलेल्या महिलेशी मैत्री केली आणि तिला गुंगीचे औषध पाजून तिच्यावर बलात्कार केला, तो एवढ्यावरच थांबला नाही तर त्याने त्या घटनेची व्हिडिओ क्लिप बनवून तिला ब्लॅकमेल करू लागला. अखेर तिने या प्रकरणी पोलिसांकडे फिर्याद नोंदवतच तीन आरोपींच्या विरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

मुंबईत सायबर क्राईमचा आलेख वाढत चालला आहे. लॉकडाऊनच्या काळात सायबर क्राईमला उत आला होता. या सायबर क्राईमच्या जाळ्यातून काही महिला पोलीस अधिकारीही सुटले नाहीत. कधी बॅंक अधिकारी तर कधी उच्चपदस्थ पोलीस अधिकारी तर कधी सीबीआय अधिकारी म्हणून काही बदमाश लोक फेसबुकवर आपले फेक अकॉऊट उघडून बसले आहेत. हे आरोपी कधी तुमच्या बॅंक खात्यातील जमा रक्कम उडवतात तर काहि महिला, तरूणीच्या इज्जतेची लक्तरे वेशीला टांगली आहेत. फेसबुकवर अनोळखी व्यक्तीबरोबर मैत्री करू नका, अशा अनोळखी मोबाईल नंबरला रिस्पॉन्स देऊ नका, सावध रहा मोहाला बळी पडू नका. अशाप्रकारच्या अनेक सुचना सायबर क्राईमचे पोलीस नागरीकांना सतत देत असतात. कधी प्रसार माध्यमातून तर कथी जाहिरातीच्या माध्यमातून पोलीस नेहमीच ...पान २ वर

## मोबाईलवरच्या बोलण्याने संशय वाढला संतप्त पतीने पत्नीचाच काटा काढला

लातूर/राम पाटोळे



आरोपी सरवदे

संशयाचे भूत एकदा का माणसाच्या मानेवर बसले कि मग त्याचे कशातच लक्ष लागत नाही. कारण त्या संशयातून त्याच्या मनात सुडाची भावना निर्माण होते. खास करून एखाद्या माणसाच्या पत्नीच्या वागण्यात काही बदल दिसू लागला आणि ती दुसऱ्याच्या संपर्कात आल्याचे पतीच्या लक्षात आले, तर संसारात वादळ निर्माण होते आणि संसार उध्वस्त होतो. किल्लारी नजीकच्या आनंदवाडीतील वीट भट्टीवर काम करणाऱ्या उमेश आणि चांगूनाच्या संसारातही संशयाची ठिणगी पडली. चांगुणा कुणाशी तरी मोबाईलवर बोलते यावरून उमेशला संशय आला आणि त्याने रागाच्या भरात तिचा खून करून पळून गेला. मात्र पोलिसांनी पुण्यात जाऊन त्याच्या मुसक्या आवळल्या.



२२ जुन २०२१ रोजी सकाळी किल्लारी पोलिस ठाण्यात मौजे आनंदवाडी येथील विट कारखाना व्यवसायीक शेख वली पाशा यांनी हजर राहात आपल्या विट भट्टीवर काम करणाऱ्या सरवदे नामक कुटूबातील एका नवरा बायकोचे रात्री जोरदार भांडण झाले असून सकाळी त्यांच्या घराला बाहेरून कलूप लावलेले दिसत आहे. बहूतेक ते पळून गेल आसावेत किंवा काहीतरी विपरीत घडले आसावे असा संशय व्यक्त केला. घटनेचे गार्भीय ओळखून किलारी पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक सुनील गायकवाड, पीएसआय अमोल गुंडे, पोहेका अनिल शिंदे, पोकॉ भोळे, बाबासाहेब इंगळे हे सर्वजण घटनास्थळाकडे रवाना झाले. मौजे आनंदवाडी शिवारातील शेख वली पाशा यांच्या विट कारखान्यावर काम करणाऱ्या मजूरांसाठी दहा – बारा कच्या विटाच्या ...पान २ वर

## शीघ्रकोपी बापाच्या संतापाचा पारा वाढला रागाच्या भरात स्वतःच्या मुलाचा मुडदा पाडला

नवी मुंबई/राजेंद्र वेदांते

समाजात विविध स्वभावाची माणसे बघायला मिळतात. काही नम्र असतात तर काही मुजोर आणि शीघ्रकोपी असतात. जे शीघ्रकोपी असतात ते जर मिलेट्री किंवा पोलीस खात्यातील असतील तर त्यांना त्यांच्या वर्दीचा माज असतो. दुसऱ्यांवर अधिकार गाजवण्याची सवय असते. अशावेळी सर्व गोष्टी त्यांच्या मनासारख्या व्हाव्यात असे त्यांना वाटत असते आणि तसे झाले नाही, तर ते एखाद्याचा जीव घ्यायलाही मागेपुढे पाहत नाहीत. नवी मुंबईतील सेक्टर ३ मध्ये राहणारे निवृत्त पोलीस अधिकारी भगवान पाटील हे सुद्धा असेच शीघ्रकोपी होते. त्यांनी शुल्लक कारणावरून झालेल्या भांडणात चक्क आपल्या दोन मुलांवर गोळीबार केला, त्यात एकच मृत्यू झाला, तर एक वाचला या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पाटील यांना अटक केली आहे.



आरोपी भगवान





नवी मुंबईतील ऐरोली सेक्टर ३ मधली. संपूर्ण नवी मुंबईत या घटनेने खळबळ माजली होती. ऐरोली सेक्टर–३ येथील भोस्कर भवन शेजारी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी भगवान पाटील हे राहतात. पत्नी आणि त्यांना सुजय आणि विजय अशी दोन मुलगे होती. असा त्यांचा परीवार होता. भगवान पाटील हा राकट, बेडर आणि संतापी व्यक्ती म्हणून तो स्थानिक भागात कुप्रसिद्ध होता. म्हणून याच्याबरोबर कुणाचेही मैत्रीपूर्ण संबंध नव्हते. त्यात हा सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी असल्यामुळे तो अनेकांना दादागिरी करत असल्याचे स्थानिक नागरीकांनी सांगितले. भगवान पाटील याने आपल्या पत्नीलाही आपल्या दहशतीखाली ठेवले होते. वडीलांच्या या कृतीला कंटाळून त्यांचा ...पान २ वर

## दारूड्या परमेश्वरने त्रास दिला फार मुलानेच केले जन्मदात्या बापाला ठार

परभणी/लक्ष्मण उजगरे

दारुडा माणूस हा संपूर्ण कुटुंबासाठी डोकेदुःखी ठरलेला असतो. कारण दारूच्या नशेत तो काहीना काही भानगडी करीत असतो आणि त्याचा त्रास कुटुंबियांना होत असतो. त्यामुळे अशा माणसाला कुटुंब वैतागलेले असते आणि त्याचा जेंव्हा त्रास सहन करण्याच्या पलीकडे जातो तेंव्हा मग कुटुंबातील लोकच नात्यागोत्याचा विचार न करता त्या दारुड्याला संपवतात. परभणी जिल्ह्यातील हिस्सा गावात अशाच एका घटनेत दारुड्या बापाला त्याच्या मुलानेच ठार मारले आणि मृतदेहाची विल्हेवाट संपूर्ण कुटुंबाने लावली. मात्र पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली.

दारूड्या बापाच्या सततच्या भांडणाला कंटाळून पोटच्या पोरान लकडाने मारहाण केली त्यात वडीला मृत्यू झाला. रातोरात वडीलाला बैगाडीत नेवून शेतात अंत्यसंस्कार करून दारू पिवून वडीलांचा मृत्यू झाल्याचा बनावा रचणाऱ्या पोराचा पोलिसांच्या सर्तकतेमुळे पर्दफाश झाला आहे. या खून प्रकरणी एका आरोपी अटक केली आहे. १५ जुन २०२१ रोजी सेलू तालुक्यातील हिस्सा गावातील मयत परमेश्वर गायके यांचा अचानक मृत्यू झाला व त्यांच्यावर ...पान २ वर

## ठसन देवून डिवचल्याने घात झाला तिघांनी सफाई कामगाराचा गेम केला

वरणगाव/क्राईम रिपोर्टर



मयत सचिन

पूर्ववैमनस्य आणि त्यातून निर्माण झालेली खुन्नस कधीतरी एखाद्याचा जीव घेते. वाढदिवसाच्या पार्टीत नाचण्यावरून झालेली मारामारी आणि त्यातून सचिन मगरे याची तिघांशी झालेली दुश्मनी एकेदिवशी सचिनच्या प्राणावर बेतली. कारण रोज जाता येता सचिन त्यांच्याकडे खुन्नसने बघत असे त्यामुळे ते तिघे सचिनवर डूक धरून होते आणि एकेदिवशी त्यांनी रात्रीच्या अंधारात सचिनचा गेम केला आणि केवळ खुनशी नजरेने ठसन दिल्याने एक तारू आपल्या प्राणास मुकला. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.







सचिन मगरे हा तरुण वरणगाव येथील आंबेडकर नगरात रहात होता. नगरपरिषदेच्या कचरा संकलन करणाऱ्या गाडीवर तो रोजंदारीने कामाला जात होता. तो रहात असलेल्या आंबेडकर नगरात अजय रविंद्र तायडे, राहुल गजानन कदम व अक्षय संजय भैसे हे तिघे जण देखील रहात होते. सर्व जण एकाच परिसरात व एकाच समाजाचे असल्याने एकमेकांना चांगल्याप्रकारे परिचीत होते. सर्व जण रहात असलेल्या कॉलनीत भोला इंगळे हे देखील ...पान ६ वर

## कामाच्या तणावाची परिसीमा झाली मुथुटच्या म्यॅनेजरने आत्महत्या केली

जळगाव/क्राईम रिपोर्टर



एखाद्या फायनान्स कंपनीसाठी कर्ज देणे कठीण नसते. पण त्या कर्जाची वसुली करणे खूप कठीण असते. कारण काही कर्जदार प्रामाणिकपणे कर्जाचे हप्ते भरतात तर काही लोकं मात्र हप्ते भरण्यास टाळाटाळ करतात. अशावेळी कर्ज वसुलीची जबादारी कंपनीच्या ज्या अधिकाऱ्यांवर असते, तो मात्र तणावाखाली असतो. अशा परिस्थितीत त्याच्यावर अतिरिक्त कामाचा बोजा पडला तर त्याची आणखी हलत खराब होते. मुथुट फायनान्स कंपनीच्या क्रेडीट म्यॅनेजारच्या बाबतीत असेच झाले. एकीकडे कर्ज वसुलीचे अवघड काम करीत असताना त्याच्या नाकी दम येत असताना त्याच्यावर कामाचा आणखी बोजा टाकण्यात आला. शिवाय वसुलीवरून वरिष्ठांची बोलणीही खावी लागत होती. अखेर त्याने या सगळ्याला कंटाळून आत्महत्या केली. या प्रकरणी त्यांच्या पत्नीने फायनान्स कंपनीच्या अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

या युगात पैशाला फार महत्व आले आहे. ...पान २ वर

## चोरीच्या मालास लागल्या संशयाच्या झळा मालकानेच आवळला ट्रक चालकाचा गळा

अमरावती/क्राईम रिपोर्टर



मयत नंदकिशोर

झटपट श्रीमंत होण्यासाठी शोधलेले शॉर्टकट नेहमीच धोकादायक असतात. पण पैशाच्या मोहापायी माणूस जीव धोक्यात घालून या मार्गावर पाय ठेवतो आणि स्वतःच्या पायावर धोंडा पडून घेतो. छिंदवाडा येथील नारायण घागरे याच्या बाबतीत सुद्धा असेच झाले. त्याचे दोन ट्रक होते. धंदाही चांगला चालला होता. पण अधिक पैशाच्या मोहाने त्याने डिलेव्हरीसाठी ट्रकमध्ये भरलेला माल परस्पर विकला आणि बारा लाख मिळवले. या गुन्ह्यात त्याचे दोन्ही ट्रक ड्रायव्हर त्याच्या सोबत होते. पण माणसाच्या हातात पैसा आला कि त्याची नियत खराब होते. त्याच्या दोन ड्रायव्हर पैकी एकजण दारूच्या नशेत आपले भांडे फोडू शकतो अशी ट्रक मालक घागरे याला संशय होता म्हणून त्याने दुसऱ्या ड्रायव्हरच्या मदतीने त्याची हत्या केली. मात्र पोलिसांनी मोठ्या शिताफीने दोन्ही आरोपींना अटक केली.






नारायण गणेश घागरे हा मध्य प्रदेशातील छिंदवाडा येथील रहिवासी होता. तो भाड्याच्या घरात रहात होता. काहीतरी व्यवसाय करुन चांगले पैसे कमावण्याचे त्याचे उद्दीष्ट होते. त्याच्याकडे पाच एकर शेत होते. शेत विकून व्यवसाय करण्याचे त्याने मनाशी ठरवले होते. दोन वर्षापुर्वी त्याने त्याचे पाच एकर शेत विक्रीस काढले. शेत खरेदी करणारा चांगला ग्राहक त्याला मिळाला. या व्यवहारात नारायण घागरे याला चांगली रक्कम मिळाली. या रकमेतून त्याने दोन ट्रक खरेदी ...पान ६ वर

## रिक्षावालीला रंगेल रिक्षावाला भेटला दोघांनी तिच्या पतीचाच जीव घेतला

डोंबिवली/क्राईम रिपोर्टर

अनैतिक संबंध कधीच लपून राहत नाहीत आणि विवाहित महिला किंवा पुरुष दोघांनाही शरीर सुखाची चटक असते. अशावेळी एखाद्या विवाहित महिलेला तिच्या पतीकडून मनासारखे शरीरसुख भेटले नाही कि मग ती दुसऱ्याला जवळ करते. डोंबिवली नजीकच्या मानपाडा येथे राहणाया एका रीक्षावालीच्या बाबतीत असेच घडले ती विवाहित असूनही दुसऱ्या रिक्षा चालकाच्या प्रेमात पडली. मात्र हि गोष्ट तिच्या पतीला समजताच दोघांमध्ये भांडणे होऊ लागली. त्यामुळे रीक्षावालीने आपल्या मित्राच्या मदतीने पतीचा काटा काढला आणि स्वतःच पती बेपत्ता झाल्याची पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली. मात्र चाणाक्ष पोलिसांनी तिचा हा डाव हाणून पडला व तिच्या यारास व तिला अटक केली.



अनैतिक संबंधातून अनेक पती परमेश्वरांची हत्या झाल्या आहेत. विवाहबाह्य संबंधातून खून, खूनाचा प्रयत्न यांसारखे गंभीर गुन्हे घडत आहेत. पती–पत्नीच्या नात्यातली पाविव्र्य लुप्त पावले आहे. विवाहबाह्य संबधातून अनेकांचे मुडदे पडले आहेत तरीही ही मालिका आजही सुरू आहे. कधी पती पत्नीची हत्या करतो, तर पत्नी पतीची हत्या करतो. हे हत्यासत्र सुरूच आहे. पती–पत्नीचे संबंध अधिकच बिघडलेले आहे. त्यामुळे या नात्यात कूटूता आली आहे. हे संबंध पूर्वीसारखे राहिले नाहीत. अशीच एक गंभीर घटना डोंबिवलीत घडली आहे. या घटनेत पत्नीने आपल्या प्रियकराच्या मदतीने ...पान ६ वर

CMYK

28 JUNE TO 04 JULY 2021 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 26/06/2021 9:14 PM Page 1



## पान १ वरून....

### मेव्हणीच्या नादाला लागून अखेर टेलर ...

अमरावती येथे रेडीमेड कपडे विक्रीचा व्यवसाय सुरु केला. त्याची साली अमिषा ही त्यांच्यासोबत रहात असल्यामुळे तिच्या शिक्षणाचा खर्च चंदु करत होता. अशा प्रकारे सर्व काही सुरळीत सुरु होते. लक्ष्मी चंचल असते असे म्हणतात. जमलेल्या पैशांच्या बळावर चंदुने अमरावती येथे पन्नास लाख रुपयांचा फ्लॅट हप्त्याने घेतला होता. मात्र दुकान आणि फ्लॅट घेतल्याचा आनंद फार काळ टिकू शकला नाही. चंदुने टाकलेले रेडीमेड कपड्यांचे दुकान एके दिवशी आगीत भस्मसात झाले. दुकान आगीच्या भक्षस्थानी सापडल्यामुळे त्याचे उत्पन्नाचे साधन संपुष्टात आले. एका क्षणात होत्याचे नव्हते झाले होते. उत्पन्नाचे साधन जळून खाक झाल्यामुळे चंदु हवालदिल झाला होता. एवढे कमी झाले म्हणून की काय गेल्या वर्षी कोरोनाची लाट आली. या लाटेत त्याच्याजवळ दुकान देखील नव्हते. त्यातच फ्लॅटच्या कर्जाचे हप्ते सुरु होते. डोक्यावर कर्ज झाल्यामुळे सहा महिन्यापुर्वी चंदू त्याची पत्नी विजया, मुले व साली अमिषा यांच्यासह नागपुर येथे राहण्यास आला. चंदुची साली अमिषा त्यांच्यासोबतच रहात होती. नागपूर येथे त्याचे सासरे व सासु सासरे पाचपावलीतील बागल आखाडा, चिमाबाई पेठ परिसरात भाड्याच्या घरात रहात होते. तेथून जवळच चंदुने देखील भाड्याचे घर राहण्यास घेतले. दरम्यान साली अमिषा हिचे काही मित्र तयार झाले होते. तिची इतर मुलांसोबत असलेली मैत्री चंदु यास खटकत होती. तिने तिच्या मित्रांसोबत संपर्क ठेवू नये असे चंदुचे तिला सांगणे होते. त्यातून दोघात वाद निर्माण झाला होता. दोघांमधील वाद एकदा तहसील पोलिस स्टेशनपर्यंत गेला होता. चंदुने तिची छेड काढून तिला मारहाण केली होती. याप्रकरणी अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती. पोलिसांनी दोघांची समजूत घातल्यानंतर तो वाद कसाबसा मिटला होता. अमिषा ही देखणी होती. गेल्या काही महिन्यांपासून तिचे दुसऱ्याशी प्रेमसंबंध निर्माण झाल्याचे चंदुला समजले. ती तिच्या मित्रांकडे गेल्याचा अंदाज आल्याने चंदु सैरभैर बनला होता. त्याने अमिषाला तीन दिवसांपासून अक्षरश: धारेवर धरले होते. तो तिच्यावर बंधने घालत होता. त्यामुळे दोघातील वाद शमण्याची चिन्हे दिसत नव्हती. त्यातच लॉकडाऊन कालावधीत त्याच्यावरील कर्जाचे हप्ते थकले होते. कर्जाचे हप्ते थकल्यामुळे आधीच अस्वस्थ झालेल्या चंदुची अवस्था बिकट झाली होती. रविवार २० जूनच्या मध्यरात्री चंदु अशोक माटुरकर (४२) याने आधी सासूच्या घरी जाऊन सासू व साली अमिषा या दोघांची हत्या केली. त्यावेळी सासरा वाचमनची रात्रपाळीची ड्युटी करण्यासाठी गेल्यामुळे तो बचावला. त्यानंतर घरी येऊन त्याने पत्नी विजया व मुलांची हत्या केली. त्यानंतर त्याने स्वत: गळफास घेत आत्महत्या केली. बराच वेळ झाला तरी माटूरकर परिवारापैकी कुणीही बाहेर आले नाही. त्यामुळे परिसरातील काही जणांनी त्यांच्या घरात झोकून पाहिले. त्यावेळी त्यांना घरात सर्वांचे मृतदेह दिसून आले. मृतांमध्ये चंदुची पत्नी विजया माटूरकर (३५), मुलगी परी माटुरकर (१४), मुलगा साहील माटुरकर (११), सासू लक्ष्मी देवीदास बोबडे (५५) व मेहुणी अमीषा देवीदास बोबडे (२१) यांचा समावेश दिसून आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हत्येपूर्वी चंदुने पत्नीचा गळा आवळून खून केला. मुलीचे हातपाय बांधून मारले तर मुलाला तोंडावर उशी दाबून मारल्याचे पोलिसांनी सांगितले. सुरक्षा रक्षकाचे काम करणारा सासरा नाईट ड्यूटीवर गेल्यामुळे तो मात्र बचावला.

### फेसबुकवरच्या मित्राच्या जाळ्यात चुकून...

याबाबत नागरीकांना सतर्क आणि दक्ष राहण्याचे आवाहन करीत असतात. सायबर क्राईमच्या गुन्ह्यातही वाढ झाली असल्याचे सायबर क्राईमच्या पोलीसांनी सांगितले. सायबर क्राईम मध्ये अज्ञात आरोपी हातोहात फसवत आहे. कधी आर्थिक लूट तर कधी लैंगिक अत्याचार असे हे भामटे गुन्हे करीत आहेत. खून, खूनाचा प्रयत्न, खंडणी, अपहरण, हाणामारी, जबरी लूट, अशा प्रकारच्या गंभीर गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यात पोलीसांना वेळ लागत नाही. कारण या गुन्ह्य़ातील आरोपींचा सीसीटीव्हीत गुन्हा सीसीटीव्हीत कैद होतो. त्यामुळेच हे आरोपी पोलीसांच्या नजरेत आड नसतात परंतू सायबर गुन्ह्यातील आरोपी हे अज्ञात असतात.त्यामुळेच हे आरोपी लवकर पोलीसांच्या हाती लागत नाहीत. सायबर क्राईमद्वारे आज असंख्य भामटे आपलं पोट भरत आहेत. म्हणून पोलीस नागरीकांना अशा भामट्यांपासून सावध राहण्याचा इशारा करीत असतात. पण तरीही अनेकजण या भामट्यांच्या जाळ्यात अडकून आपले सर्वस्व हिरावून बसतात. बऱ्याचदा असे निदर्शनास आले आहे की जे पोलीस नागरीकांना अशा भामट्यांपासून सावध राहण्याचा सल्ला देत असतात तेच पोलीस या भामट्यांच्या जाळ्यात अडकल्याचा एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. अलिकडेच मुंबई पोलीस दलातील सहाय्यक पोलीस निरीक्षक दर्जाची एक महिला पोलीस अधिकारी या आरोपींच्या जाळ्यात फसली. फेसबुकवर झालेल्या मैत्रीतून आरोपीने या महिला पोलिस अधिकाऱ्याला गुंगीचे औषध देऊन तिच्यावर अनेकदा बलात्कार केल्याचा प्रकार उजेडात आला आहे. हा आरोपी एवढ्यावरच थांबला नाही तर संबधित आरोपीने अश्लील व्हिडीओ क्लीप तयार करून त्या महिला पोलीस अधिकार्याला धकावले सुद्धा. जेव्हा या आरोपीचा त्रास सहन होत नसल्याने या महिला पोलीस अधिकाऱ्याने पवई पोलीस ठाण्यात धाव घेऊन आरोपीविरुद्ध तक्रार दाखल केली. फेसबुकवर झालेल्या मैत्रीतून आरोपीने महिला पोलिस अधिकाऱ्याला गुंगीचे औषध देऊन बलात्कार केल्याचा प्रकार उजेडात आला आहे. आरोपीने अश्लील व्हिडीओ काढून धकावल्याची तक्रार या महिला अधिकाऱ्याने केली आहे. याप्रकरणी आरोपीसह त्याच्या दोन मित्राविरोधात पवई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा गुन्हा पुढील तपासासाठी मेघवाडी पोलिस ठाण्यात वर्ग केला असून पोलिस आरोपींचा शोध घेत आहेत. पोलिस दलात कार्यरत असलेल्या या महिला अधिका-याची फेसबुकवर आरोपीशी ओळख झाली. त्यानंतर दोघांमध्ये मैत्री झाली. ती मैत्री आणखी घट्ट झाली. अनेकदा हे दोघे ऐकमेकांना भेटण्यासाठी आतूर होत होते. या गुन्ह्य़ातील आरोपी शातीर निघाला. त्याने महिला पोलीस अधिकाऱ्याला चकाला येथे बोलावले होते. त्यावेळी शीतपेयातून महिलेला गुंगीचे औषध देऊन आरोपीने महिलेवर बलात्कार केला. एक अनुभवी महिला पोलीस अधिकारी अशा भामट्याच्या जाण्यास फसतेच कशी असा सवाल विचारला जात आहे. हि महिला पोलीस अधिकारी या आरोपीच्या प्रेमात इतकी आंधळी झाली की, आरोपीने तिचे व आपल्या प्रणयाचे क्षणांचे अश्लील चित्रीकरण आणि फोटो काढले तरी तिला कळले नाही. हि व्हिडीओ क्लिप जेंव्हा त्या आरोपीने महिला पोलीस अधिकाऱ्याला दाखवले तेंव्हा तिच्या पायाखालची जमीनच सरकली. पूढे त्याच व्हिडिओच्या सहाय्याने आरोपी महिला पोलीस अधिकाऱ्याला धमकावत होता. ते व्हिडिओ सार्वजनिक आणि प्रसार माध्यमातून प्रसारीत करण्याची धमकी देऊन आरोपीने त्यांच्यावर वारंवार बलात्कार केल्याचा आरोप फिर्यादी महिला पोलीस अधिकारी महिलेने केला आहे. ऐवढ्यावरच न थांबता आरोपीने व्हिडिओ सोशल मिडियावर टाकून बदनामी न करण्यासाठी पैशाची मागणी केली, असा आरोप महिलेने केले आहेत. याप्रकरणी आरोपीच्या दोन मित्रांनी महिला पोलिस अधिकाऱ्याला धमकावले असून त्या दोघांविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या सर्व त्रासातून महिला अधिकारी बाहेर पडली असता आरोपीने महिलेच्या होणाऱ्या पतीलाही फोन करून महिलेची बदनामी करण्याची धमकी दिली. या त्रासाला कंटाळून अखेर या महिला अधिकाऱ्याने पोलिसांत तक्रार केली. त्यानुसार पवई पोलिस ठाण्यात भा.द.वि कलम ३७६ (आय) (एन) ३२८,३८४, १२०(ब), ५०४, ५०६, ५०९, ५०० सह माहिती तंत्रज्ञान गैरवापर प्रतिबंधक कायदा कलम ६६(क) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा महिला पोलीस अधिकारीवर बलात्कार आणि ब्लॅकमेलिंग करण्याचा गुन्हा मेघवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडल्यामुळे पुढील तपासासाठी मेघवाडी पोलिस ठाण्याकडे हा गुन्हा वर्ग करण्यात आला आहे. याप्रकरणी मेघवाडी पोलिस पुढील तपास करणार आहेत. दरम्यान या गुन्ह्याबाबत मेघवाडी पोलीस ठाण्यातील विशेष सुत्रांनी सांगितले की, या गुन्ह्य़ात एकून तीन आरोपी असून यातील मुख्य आरोपी औरंगाबाद येथील असल्याचे पोलीसांच्या तपासात स्पष्ट झाले आहे. या आरोपींनी अशाच प्रकारे अजून किती महिलांचा उपभोग घेतला आहे याचीही माहिती पोलीस घेत आहेत.

### शीघ्रकोपी बापाच्या संतापाचा पारा...

एक मुलगा वसईला राहयला गेला होता. १४ जूनच्या संध्याकाळी दोन्ही मुलगे घरातच असताना वादाची ठिनगी पडली. आपली कार सर्विसिंगला कोण घेऊन जाणार? यावरून भगवान पाटील व त्यांच्या मुलांसोबत किरकोळ स्वरूपात भांडण सुरू झाले होते. हळूहळू वाद विकोपास गेला. आपली मुले आपल्याबरोबर वाद घालण्याचे धाडस कसे काय करू शकतात? हि बाब भगवान पाटील यांना सहन झाली नाही. तेंव्हा संतापाच्या भरात त्यांनी आपल्याकडे असलेली सर्वीस रिव्हाल्वर बाहेर काढून कुणालाही काही कळायच्या आत त्यांनी त्या रिव्हाल्वर मधून तीन राऊंड फायर केले. त्यातील एक राऊंड सुजयला लागली तर दोन राऊंड विजयला वर्मी लागले. यात विजय क्षणार्धात खाली कोसळला. तो गंभीर जखमी झाला होता. तर त्याचा भाऊ सुजय हा किरकोळ जखमी झाला होता. त्याच्या कमरेला गोळी चाटून गेली होती. स्थानिक नागरीकांनी तातडीने सुजय आणि विजयला जवळपास असणाऱ्या इंद्रावती हॉस्पीटलमध्ये उपचारार्थ दाखल केले, परंतू काही तासानंतर विजयचा मृत्यू झाला. विजयच्या पोटात, खांद्यावर दोन गोळ्या वर्मी लागल्यामुळे विजयच्या पोटातील आतडी फाटून त्यातून मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव झाल्याने त्याची प्रकृती खालावली व त्यातच त्याचे निधन झाले. गोळीबाराची हि खबर रबाळे पोलीसांना लागताच रबाळे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पवार, पोलिस निरीक्षक (गुन्हा) उमेश गवळी, पोलिस उपनिरीक्षक अमित शेलार आणि रबाळे पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन, भगवान पाटील यांना अटक करण्यात आल्यानंतर त्यांच्याकडील रिव्हाल्वर जप्त करण्यात आली असल्याचे रबाळे पोलीसांनी सांगितले. आपल्या पोटच्या पोरांवर गोळी झाडणारे भगवान पाटील हे नवी मुंबईतील सेवानिवृत्त पोलीस अधिकारी आहेत. घरातील आपापसातील वादामध्ये हि घटना घडली असल्याचे पोलीसांचे म्हणणे आहे. पाटील यांचा मुलगा सुजय हा वसई मध्ये वास्तव्यास आहे तर दुसरा मुलगा विजय हा ऐरोलीमध्येच राहतो. भगवान पाटील यांनी 'तुला गिफ्ट द्यायचे आहे'. असे आमिष दाखवून त्याला कॉल करून सुजयला आपल्या घरी बोलावून घेतले व घरातील आपापसातील भांडणांमध्ये भगवान पाटील यांनी त्यांच्याकडील सर्व्हिस रिव्हॉल्वर मधून त्यांच्या दोन्ही मुलांच्या दिशेने ३ गोळ्या झाडल्या. यामध्ये मुलगा सुजय याला १ गोळी चाटून गेली तर विजयला २ गोळ्या वर्मी लागल्या असून विजय पाटील यांची प्रकृती खालावल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. या गोळीबारापूर्वी भगवान पाटील यांनी मद्यप्राशन केले होते. पाटील हे निवृत्ती पोलीस अधिकारी असल्यामुळे यांच्याकडे परवाना असलेल्या सर्व्हिस रिव्हॉल्वर होते. याच सर्व्हीस रिव्हाल्वरच्या साहाय्याने त्यांनी हा गोळीबार केला. यावेळी रबाळे पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक पवार, पोलिस निरीक्षक (गुन्हा) उमेश गवळी, पोलिस उपनिरीक्षक अमित शेलार आणि रबाळे पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी अधिक तपास करीत आहेत. भगवान पाटील याने आपल्याच मुलावर गोळीबार का केला? भगवान पाटील हे ऐवढ्या टोकाला का गेले. हे जरी समजू शकलेले नसले तरी. मात्र, गाडीच्या सर्व्हिसिंगच्या पैशांवरुन दोघांमध्ये वाद झाला होता, असे आता सांगण्यात येत आहे. पैशांचा वादानंतर टोकाला गेल्यामुळे भगवान पाटील या पित्याने मुलगा विजय पाटीलवर गोळ्या झाडल्या. भगवान पाटील हे माजी नगरसेवक राजू पाटील यांचे नातेवाईक आहेत. भगवान पाटील यांनी याआधीही अशाच प्रकारचे कृत्य केलेले आहे. त्यांनी राजू पाटील यांच्यावर रिव्हॉल्व्हर रोखली होती. या प्रकारामुळे तक्रार दाखल केल्यानंतर भगवान पाटील यांच्याकडून रिव्हॉल्व्हर जप्त करण्यात आली होती. मात्र, आता रिव्हॉल्वहर परत मिळाल्यानंतर भगवान पाटील यांनी आपल्याच मुलांवर गोळ्या झाडल्या आहेत. या प्रकारामुळे सध्या नवी मुंबई परिसरात खळबळ उडाली आहे. या माथेफिरू आरोपीला रिव्हाल्वरचा परवाना मिळाला कसा? पोलीसांनी जप्त केलेली रिव्हाल्वर परत केली नसती तर त्यांच्या मुलाचा जीव वाचला असता. भगवान पाटील यांनी माजी नगरसेवक राजू पाटील यांना रिव्हाल्वरचा धाक दाखवल्यानंतर त्यांचा रिव्हाल्वर परवाना निलंबित करून तो जप्त करण्यात आला होता. मात्र अशा माथेफीरू, सनकी व्यक्तीला परत परवाना आणि रिव्हाल्वर मिळाले कसे याची चौकशी सहाय्यक पोलीस आयुक्त विनायक वस्त करीत आहेत. रिव्हाल्वर परत केल्यानंतरच भगवान पाटील यांनी आपल्या मुलाची हत्या करण्याचे टोकाचे पाऊल उचलले. भगवान पाटील यांना रिव्हाल्वर परवाना व रिव्हाल्वर परत केली नसती तर आज विजय पाटील या त्यांच्या मुलाचा जीव वाचला असता.

### मोबाईलवरच्या बोलण्याने संशय ...

खोल्या बांधल्या होत्या. विट कारखान्यापासून काही अंतरावर आसलेल्या एका खोलीचा दरवजा बाहेरून बंद दिसत होता. विट कारखान्यावरील मजुरांनी खोलीबाहेर गर्दी केली होती. उमेश सरवदे आणि चांगुना सरवदे रहात असलेल्या घराला बाहेरून कुलूप लावलेले दिसत होते. पोलिस विटभट्टीवर पोहंचताच मजूरांनी पांगा-पांग करत पोलिसांना रस्ता सोडला. विट कारखाना मालक शेख वली पाशा यांनी समोर येत पोलिसांना माहीती दिली. पोलिसांनी त्या घराचे बारीक निरीक्षण करून बंद घराचा कानोसा घेतला. शेवटी पोलिसांनी पंचांसमक्ष संबंधित घराचा दरवाजा तोडून घरात प्रवेश केला. घरात प्रवेश करताच पोलिसांना एक भयावह चित्र दिसले. घराच्या एका कोपऱ्यामध्ये एक ४० ते ४२ वर्षीय महिला निपचीत पडली होती. पोलिसांनी तिच्या जवळ जाऊन अंदाज घेतला असता ती महीला मयत झाली आसल्याचा अंदाज आला. तिच्या गळ्याभोवती काळे वण दिसत होते. रूम मध्ये पडलेले अस्ताव्यस्त सामान वरून मारेकरी व महिला मध्ये बरीच झटापट झाल्याचे जाणवत होते. दरम्यान औसा शहर उपविभागीय पोलिस अधिकारी राजीव नवले यांनी घटनास्थळाला भेट दिली. घटनास्थळाचा प्राथमिक आढावा घेतला आणी पोलिस कर्मचारी आणि अधिकारी यांना योग्य त्या सूचना देऊन पंचनामा करण्यास सांगितले. किल्लारी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सुनील गायकवाड व त्यांच्या टीमने पंचनाम्याला सुरुवात केली. वीट कारखान्यावर काम करत असलेल्या आणि घटनास्थळावर हजर असलेल्या लोकांकडून अधिक माहिती जाणून घेतली. औसा तालुक्यातील लामजना येथील मूळ रहीवाशी आसलेले उमेश बाबू सरवदे आणि चांगूना सरवदे हे दोघे नबरा बायको गेल्या अनेक दिवसापासून अनंदवाडी शिवारातील विट कारखान्यावर विटा थापण्याचे काम करत असल्याची माहिती समोर आली. मयत चांगूना उमेश सरवदे ही मूळ निलंगा तालुक्यातील राठोडा येथे राहणारी असल्यामुळे मयत चांगूना सरवदे यांच्या नातेवाईकांना पोलिसांनी बोलून घेतले. मयताचे नातेवईक घटनास्थळी येताचा त्यांनी जोरात विलाप करण्यास सुरूवात केली. जवायाने माझ्या मुलीचा काटा काढला साहेब त्याला सोडून नका असा आक्रोश करू लागले. दरम्यान मयत चांगूना हिचा नवरा २१ जून २०२१ रोजी सायंकाळी दोघाचे भांडण झाल्यापासून विट कारखान्यावर नसल्याचे समोर आले. तसेच त्याचा मोबईलपण बंद येत आसल्याने पोलिसांचा सेशय अधिक बळावला. मयत चांगुनाबाई यांचा भाऊ सुरेश नागू कांबळे यांच्या फिर्यादीवरून किल्लारी पोलीस ठाण्यामध्ये गुरनं ११८/ २०२१ कलम ४९८ (ए)३०२,३२३,५०४,५०६ भादवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव औसा शहर उपविभागीय पोलिस अधिकारी राजीव नवले यांच्या मार्गदर्शनाखाली तपासा चे सर्व सूत्र किल्लारी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सुनील गायकवाड यांच्या हाती देण्यात आले. सहायक पोलीस निरीक्षक सुनील गायकवाड यांनी तपासाची चक्रे गतिमान करून या प्रकरणातील प्राथमिक माहिती जाणून घेण्यास सुरुवात केली. मयत चांगूना सरवदे यांच्या नातेवाईकांना अधिक विचारपूर केली आसता. निलंगा तालुक्यातील नागू कांबळे यांची मुलगी चांगूना हिचर विवाह लामजना येथील रहिवाशी उमेश बाबू सरवदे यांच्यासोबत झाला होता. लग्ना नंतर काही दिवस चांगून आणी उमेश यांचया संसार सुखात गेला. उमेश सरवदे हा कामणंदा करून आपल्या कुटूंबाचा उर्दरनिर्वह भागवत होता. दरम्यान उमेश सरवदे याला दारू पिण्याचे व्यसन होते. चांगूना सरळ स्वभावी व चंचल स्वभावाची होती. त्यामुळे उमेश चांगूनावर सारख लक्ष ठेवून होता. परमाणसाला सहज बोलले तरी उमेश सरवदे आपल्या पत्नीच्या चारीत्र्यावर संशय घेत होता. त्यामुळे त्यांच्यात अनेकदा भांडणेही होत होती. या कारणाने चांगूना अनेकदा माहेरी राहण्यास गेल होती. पण आज नाहीतरी उदया चांगल होईल या आशेने तिला परत माहेरी नांदवण्यास पाठवून दिले होते. लामजणा गावात कामधंद्यात मन लागत नसल्याने उमेश सरवदे याने गाव सोडून इतर गावात काम करण्याचे ठरविले होते. त्यासाठी त्यांने आनंदवाडी येथे आसलेल्या विट भट्टीवर काम करण्याची तयारी दर्शवून तेथून उचल पैसे घेतले. व काही दिवसातच दोघे नवरा-बायको विट भट्टीवर विटा थापण्यासाठी गेले. तेथे काही दिवसच दोघे चांगल राहीले. तेथेही उमेश सरवदे आपल्या पत्नीवर संशय घेवून पत्नी चांगूनाला मारहाण करू लागला एवढी माहीती पोलिसांना मिळाली. साहायक पोलिस निरीक्षक सुनिल गायकवाड यांनी या घटनेतील प्रत्येक बाजूचा आभ्यास करून तपासाला गती दिली. उमेश सरवदे वापरात आसलेला मोबाईल बंद येत आसलयाने त्याचा ठाव-ठिकाणा लागत नव्हता. उमेश सरवदे याचा शोध घेणे गरजेचे होते. तो पोलिसांना मिळून आल्यासच या गुन्ह्याचा गुंता सुटणार होता. त्यासाठी किल्लारी पोलिसांनी या खून प्रकरणातील संशयीत आरोपी उमेश सरवदे याचा शोध सुरू केला. खास खबऱ्याना माहीती पाठवून उमेश सरवदे याचा माग काढण्यास सांगितले. उमेश सरवदे याचे नातेवाई, मित्र, सगे- सोयरे यांच्याशी संवाद साधून उमेश सरवदे याला शोधण्याचा प्रयत्न केला पण उमेश सरवदे याचा कुठेच ठावा लागत नव्हता. दरम्यान एका खास खबऱ्याकडून उमेश सरवदे हा २१ जून २०२१ रोजी रात्री चौरस्ता मार्ग पुणे येथे गेल्याची पक्की माहीती साहायक पोलिस निरीक्षक सुनिल गायकवाड यांना मिळली. मिळालेल्या माहीतीवरून किल्लारी पोलिसांचे एक पथक तयार करून पुझे येथे पाठविले. किल्लारी पोलिसांच्या पथकाने पुणे येथील बस्थनकावर सापळ लावून उमेश सरवदे याच्या मुस्क्या आवळल्या. त्याला किल्लारी पोलिस ठाण्यात हजर केले. त्याला विश्वासात घेवून मयत चांगूना सरवदे हिच्या खूनाविषयी विचारले असता त्यांने पोलिसांना असमाधानकारक उत्तरे दिली. त्याला विश्वासात घेवून विचारपूस केली असता त्यांने आपल्या गुन्ह्याची कबूल देवून सांगण्यास सुरूवात केली. २१ जून २०२१ रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास चांगूना आणी उमेश यांच्यात मोबाईलवर आलेल्या कॉलवरून जोराचे भांडण झाले. तो कोणाचा फोन होता हे उमेश विचारत होता पण सगूना सांगण्यास तयार होत नव्हती. यावरूनच दोघात कडक्याचे भांडण झाली. राग अनावर न झालेल्या उमेशने चांगूनाचा गळा आवळण्यास सुरूवात केली. उमेशच्या शक्तीसमोर चांगूना हातबल झाली. चांगून निचपती झाल्याचे पाहून उमेश शुद्धीवर आला. व त्याने तेथून पळून जाण्याचा बेत आखला व तो पुणे येथे गेला. पण किल्लारी पोलिसांनी आवघ्या तासातच उमेशला गजाआड केले. याचा पुढील पतास साहायक पोलिस निरीक्षक सुनील गायकवाड करीत आहेत.

### दारूड्या परमेश्वरने त्रास दिला फार...

रातोरात अंत्यसंस्कार केले. ही चर्चा इतकी पसरली की, ही खबर सेलु पोलिस ठाण्यापर्यंत पोहचली. या घटनेपाठीमागे नक्कीच घातपात असल्याचा संशय पोलिसांना बळावल्याने सेलु पोलीसांनी १५ जुन रोजी गावात जावुन घटनास्थळाची पाहणी करुन पंचनामा केला. व कुटुंबातील सर्वांचे जबाब नोंदविले आणी एका गुन्ह्याला वाचा फु टली. याप्रकरणी सरकारी फि र्यादिवरून सेलू पोलिस ठाण्यात आरोपी विरोधात गुरनं १८४/ २०२१ कलम ३०२,२०१ भादविं गुन्हा नोंद करण्यात आला. जिल्हा पोलिस अधिक्षक, उपविभागीय पोलिस अधिकारी राजेंद्र काल यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाचे सर्व सुत्र सेलू पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक रामेश्वर तट यांच्या हाती देण्यात आले. तपासाचे चक्र गतिमान करून या खुन प्रकरणीची प्राथमिक माहीती जाणून घेण्यासाठी पोलिसांनी तपासाला सुरूवात केली. पोलिसांनी सर्वप्रथम मयत परमेश्वर गायके यांचे गाव गाठले. तेथे गायके यांच्या कुटूंबियांची भेट घेवून अधिक माहीती जाणून घेतली . परभणी जिल्ह्यातील सेलु तालुक्यातील हीस्सी या गावचे मुळ रहिवाशी असलेले परमेश्वर गायके हे शेती व्यवसाय आणी शेतमजूरी करून आपल्या कुटूंबाचा गाडा चालवित होते. गावापासून ५० मीटर अंतरावर परमेश्वर गायके आपल्या पत्नी आणी तीन मुलांसह राहत होता. परमेश्वर गायके यांना दारुचे चांगलेच व्यासन जडले होते. मुल मोठी आणी कमवती झाल्याने परमेश्वर गायके यांच्यावरील अर्थीक भार काही प्रमाणात हालका झाला होता. यातूनच त्याचे दारूचे व्यासन त्यांना दिवसभर बेधूंद करत होते. शोतात लागेल ते काम करणे आणी मिळालेल्या पैश्यातून दारू पिणे असा नित्य नियम परमेश्वर गायकेचे चालू होता. दररेज रात्री दारू पिणे आणी घरात क्षुल्लक क्षूल्लक कारणावरून वाद घालणे हे काही गायके कुटूंबाला नवीन राहीले नव्हते. त्यामुळे गायके कुटूंबाच्या घरातील शांतता भंग पावली होती. कितीही सांगून वडील ऐकत नसल्याने वडीलांच्या वागण्याकडे आता पोरांनीपण दुर्लक्ष केले होते. मुल मोल-मजुरी करुन आपला उदरनिर्वाह चालवत होते. मात्र मयत परमेश्वर गायके दारुच्या व्यसनापायी सतत काहीना-काही कुटाने करत रहात होते. त्यामुळे मयत परमेश्वर गायके यांच्या घरातील वातावरण दुषीत झाले होते. एवढी माहीती पोलिसांनी हास्तगत केली. दरम्यान गावातून गुप्त माहीती झेतली असता मयत परमेश्वर गायके हे दारुची लत पुर्ण करण्यासाठी १४ जुन २०२१ रोजी गावातुन भाड्याने जीप करुन दारू पिण्यासाठी सेलु गावाकडे गेले होते. रात्री उशीरा ते दारू पीऊन घरी आले. दारूच्या नशेत परमेश्वर गायके यांनी घरात शिवीगाळ करण्यास सुरूवात केली. परमेश्वर गायके यांचा मोठा मुलगा हानुमान गायके आणी परमेश्वर यांच्यात जोराचे भांडन सुरु झाले. काही काळातच हाणामारी देखील झाली आणी अचानक भांडणाचा जोर थांबला. परमेश्वर गायके यांचा कुटुंबीयांनी मयत परमेश्वर गायके यांच्यावर रातोरात अंत्यसंस्कार करुन टाकल्याने सकाळी १५ जुन २०२१ रोजी उलट-सुलट चर्चा सुरु झाली अशी माहीती पोलिसांना मिळाली. घरातच कुठेतरी पाणी मुरतय असा पोलिसांचा पक्का संशय झाला.मात्र सबळ पुराव्यासठी पोलिस धडपडत होते. मयत परमेश्वर गायके यांच्या खुन प्रकरणाच्या तपासकामी पोलिसांनी मुलांना चौकशी साठी सेलु पोलिस ठाण्यात नेले. मयत परमेश्वर गायके यांच्या कुटूंबातील प्रत्येकांचे वेगवेगळे जबाब नोदविण्यात आले. परंतु प्रत्येकाचा जबाबात विसंगती आढळून आल्याने पोलिसांनी त्यांना विश्वासात घेवून अधिक विचारपूस केली असता मयत परमेश्र्वर गायके यांचा मोठा मुलगा हानुमान गायके यांने सांगण्यास सुरूवात केली. माझे वडील परमेश्वर गायके हे व्यसन करुन घरातील कुटुंबातील व्यक्तींसोबत सतत भांडण करुन त्रास देत होते. १४ जुन २०२१ रोजी परमेश्वर गायके गावातुन भाड्याने जीप करुन दारू पिण्यासाठी सेलु गावाकडे गेले होते. रात्री उशीरा ते दारू पीऊन घरी आले. आणी रात्री घरात धिंगाना घालण्यास सुरूवात केली. त्यांना सगळेजण समजावून सांगत होते पण ते कोणाचेच ऐकत नव्हते. सततच्या भांडनांचा राग आल्याने वडीलांना लाकडाने मारहाण करण्यास सुरूवात केली. लाकडाचे घाव वर्मी लागल्याने त्यांच्या शरीरातून रक्ताच्या धारा वाहू लागल्या त्यामध्ये त्यांचा मृत्यू झाला. तेंव्हा मी भानावर आलो. वडील मेल्याने त्यांच्या प्रेताची विल्हेवाट लावण्यासाठी शेजारील शेतकऱ्यांची बैलगाडी आणली. वडील दारूच नशेत पडले असून त्यांना दवाखान्यात घेवून जात आसल्याचे कारण त्या शेतकऱ्याला सांगितले. बैलगाडीत वडीला मृतदे टाकून मी येतात गेलो. शेतात आसलेला लाकूड फ ाटा गोळा करून सरण तयार केले व त्याला पेटवून दिले व घरी परत आलो. असा कबुली दील्याने आरोपी हानुमान गायके याच्या विरोधात सेलु पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी हानुमान गायके याला न्यायालयात हजर केले असता हानुमान गायके याला पाच दीवसाची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. या खून प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक रामेश्वर तट करीत आहेत.

### कामाच्या तणावाची परिसीमा झाली...

आर्थिक निकड भागवण्यासाठी कर्ज घेतले जाते. आपल्या देशातील अर्थव्यवस्थाच अशी काही निर्माण करण्यात आली आहे की प्रत्येकाला कधी ना कधी कर्ज घ्यावेच लागते. बरेच उद्योगपती, व्यावसायीक आयकर विवरणात सुट मिळवण्यासाठी कर्ज घेत असतात. काही सामान्य लोक खरोखर अत्यावश्यक गरज म्हणून कर्ज घेत असतात. आपला सिबील स्कोर दिसण्यासाठी अनेकांना लहानमोठे कर्ज घ्यावे लागते. आपले लोन प्रॉडक्ट विकण्यासाठी खासगी फायनान्स कंपन्या आपल्या अधिका-यांना टार्गेट देते. हे टार्गेट पुर्ण करण्यासाठी व सामान्य मनुष्याला कर्जाच्या चक्रव्युहात अडकवण्यासाठी विविध फायनान्स कंपन्या विविध ऑफरचे आमिष दाखवून अडकवतात. या चक्रव्युहाला फायनान्स कंपन्या लोन जर्नी असे म्हणतात. या लोन जर्नीच्या विळख्यात एकदा का मनुष्य फसला म्हणजे त्याची मानसिकता खराब होत असते. एखादा हप्ता चुकला अथवा थकला म्हणजे कुत्री मागे लागतात त्याप्रमाणे या फायनान्स कंपन्यांचे फोन दिवसभर भुंकत असतात. त्यांचे सातत्याने मेसेज येत असतात. त्यातून कर्जदाराचे मानसिक संतुलन बिघडते व तो व्याधीग्रस्त होतो. सरकारी बँका सहजासहजी सामान्य मनुष्याला कर्ज देत नसल्यामुळे त्याला नाईलाजाने खासगी फायनान्स कंपन्यांची पायरी चढावी लागते. फायनान्स कंपन्यांची संगत म्हणजे मानसिकता खराब करुन घेण्याचे काम आहे. गरजवंत सामान्य मनुष्य कर्ज प्रकरणाच्या बारीक बारिक अक्षरातील भरमसाठ कागदपत्रांवर पटापट सह्या करतो. त्याला ते कागदपत्र वाचण्याची संधी देखील दिली जात नाही व सह्या करण्यास भाग पाडले जाते. सामान्य मनुष्याला जेरीस आणणाऱ्या फायनान्स कंपन्यांना ठगवणारे महाभाग देखील असतात. सामान्य मनुष्याची मानसिकता खराब करणा-या फायनान्स कंपनीच्या अधिका-यांना त्यांची मानसिकता खराब करणारे महाभाग देखील भेटतात. शेरास सव्वाशेर भेटणे या म्हणीचा प्रत्यय कंपनी अधिका-यांना या निमीत्ताने येत असतो. फायनान्स कंपनीत काम करणे व या कंपनीशी संबंध येणारे कर्जदार हे दोघेही घटक सुखी नसतात. त्यामुळे जुने जाणते लोक नेहमी सांगत असत की उपाशी रहावे मात्र कुणाचे कर्ज घेऊ नये. जळगाव जिल्ह्याच्या जामनेर तालुक्यातील भारुडखेडा या गावातील दहा ते बारा जणांनी बोगस कागदपत्राच्या आधारे मुथुट फायनान्स या फायनान्स कंपनीकडून कर्ज घेतल्याचे म्हटले जात आहे. कथीत बोगस कागदपत्राच्या आधारे देण्यात आलेले कर्ज प्रकरण या कंपनीसाठी एक डोकेदुखीचा विषय झाला होता. या कर्जदारांकडून वसुली करण्याची जबाबदारी कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रदीप धनलाल शिंपी या क्रेडीट मॅनेजरकडे सोपवली होती. या कर्जदारांकडून वसुली झाली नाही तर तुमच्या पगारातून पैसे वसुल करु अशी धमकी त्यांना दिली जात होती असे म्हटले जाते. या वसुलीच्या तगाद्यामुळे प्रदीप शिंपी यांची मानसिकता बिघडली होती. ते कायम तणावात रहात होते. १ नोव्हेंबर २०१७ पासून प्रदीप धनलाल शिंपी (मयुर कॉलनी जळगाव) हे मुथुट फायनान्स इंडीया लिमीटेड या कार्यालयात क्रेडीट मॅनेजर या पदावर कार्यरत होते. त्यांच्यावर कंपनीने जळगावसह औरंगाबाद, धुळे व शिरपुर येथील वसुलीची जबाबदारी दिली होती. कंपनीच्या विविध स्वरुपाच्या कामांची जबाबदारी त्यांना दिली जात होती. गेल्या सहा महिन्यांपासून हा अतिरिक्त ताण वाढला होता. असह्य होणारा हा ताण ते आपल्या पत्नीजवळ बोलून दाखवत होते. या ताणतणावामुळे ८ जून रोजी त्यांची तब्येत बिघडली होती. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. २० जून रोजी शिंपी आपल्या परिवारासह नातेवाईकांकडे एका कार्याक्रमात गेले होते. रात्री उशिरा घरी आल्यानंतर ते एकटेच घरातील बैठक हॉलमध्ये झोपले. त्यांची पत्नी व दोन्ही मुले मागच्या खोलीत निजले होते. त्यांची पत्नी व मुले गाढ झोपली असली तरी शिंपी यांची झोप शेकडो मैल दूर पळाली होती. त्यांना कायमचे झोपायचे होते. सकाळी साडेसहा वाजता त्यांचा लटकलेला मृतदेह घरातील सर्वांना दिसून आला. त्यांनी गळफास घेत आत्महत्या केल्याचे दृश्य बघताच त्यांच्या पत्नीसह मुलांनी टाहो फोडला. या घटनेची माहिती मिळताच रामानंद नगर पोलिस स्टेशनचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. नातेवाईकांच्या मदतीने त्यांचा मृतदेह खाली उतरवण्यात आला. तो मृतदेह उत्तरीय तपासणीकामी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात रवाना करण्यात आला. प्रदीप शिंपी यांनी तिन पानांची सुसाईड नोट लिहून ठेवली होती. त्यात कुटूंबियांना मदत करा व मला माफ करा असे आवाहन केले आहे. कामाचा ताण व अतिरिक्त दबाव हे त्यांच्या सुसाईड नोटमधील प्रमुख मुद्दे होते. कंपनीच्या विविध प्रकारच्या कामांची जबाबदारी आपल्यावर सोपवली जात होती असे सुसाईड नोटमधे त्यांनी नमुद केले आहे. कमी मनुष्य बळात जास्तीत जास्त काम करावे लागत असल्याचा उल्लेख त्यांनी चिठ्ठीत केला आहे. अतिरिक्त काम वेळेत पुर्ण करण्यासाठी वरिष्ठांकडून टाकला जाणरा दबाव आणि नोकरी जाण्याची भिती असे विविध मुद्दे त्यांनी चिठ्ठीत नमुद केले. कंपनीतील इतर सहकारी, अधिकारी, कंपनी मालकांनी भविष्य निर्वाह निधी, पेन्शन, आर्थिक मदत देऊन कुटूंबाला मदत करण्याचे आवाहन देखील त्यांनी केले. सुसाइड नोटच्या काही झेरॉक्स प्रती मृत्यूपुर्वी शिंपी यांनी घरात वेगवेगळ्या ठिकाणी ठेवल्या होत्या. या कॉपी, मुळ सुसाइड नोट कुठे ठेवली आहे याची माहिती देणारी एक वेगळी नोट त्यांनी मुलाच्या नावाने लिहून ठेवली होती. याच नोटच्या आधारे परिवाराने ती मुळ सुसाइड नोट शोधून काढली. पुणे येथील वरिष्ठ अधिकारी प्रशांत बर्गे यांच्या तणावाखाली असल्यामुळेच पतीने आत्महत्या केल्याचा आरोप त्यांची पत्नी सुचीता यांनी केला. सचिन बर्गे यांच्च्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी मृत प्रदीप शिंपी यांची पत्नी सुचीता यांनी केला. त्यांच्यासह नातेवाईकांची समजूत काढल्यानंतर नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेतला. याप्रकरणी रामानंद नगर पोलिस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली.

# वलांडी येथे रास्ता रोको अंदोलन

## राज्य मार्ग २३८चे काम लवकर चालू करण्याची मागणी



**देवणी/प्रतिनिधी**

नव्याने तयार होत असलेल्या राज्य मार्ग क्रमांक. २३८ निलंगा ते तोगरी चे बंद असलेले काम त्वरित सुरू करावे आणि जे काम झाले आहे ते अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून ते मोजमाप पुस्तिकेप्रमाणे झाले नाही म्हणून याची गुण नियंत्रक पथकामार्फत चौकशी करून अनेक वेळा याबाबत तक्रार देऊन ही याची दखल न घेणाऱ्या आणि गुत्तेदारास पाठीशी घालणाऱ्या मुजोर अधिकाऱ्यावर कारवाई करावी अशी मागणी य वेळी करण्यात आली. राज्य मार्ग क्रमांक २३८ या रस्त्याचे काम गेल्या अनेक महिन्यापासून बंद आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस आल्यामुळे रस्ता हा पुर्णपणे निसरडा झाला आहे. त्यावर अनेक दुचाकीवाले घसरून पडत आहेत आणि जखमी होत आहेत. पूर्ण रस्ता खोदून ठेवल्यामुळे रस्त्यावर चिखलच चिखल झाला आहे. परिणामी अनेक अपघात होत असून या रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे म्हणून दि. २३/६ रोजी वलांडी येथील मुख्य चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाची दखल घेऊन लवकरात लवकर या रस्त्याचे काम सुरू करावे, आणि आतापर्यंत झालेले रस्त्याचे काम हे निकृष्ट दर्जाचे झाले असून व मोजमाप पुस्तिकेप्रमाणे (एम.बी.) प्रमाणे झालेले नाही. त्यामुळे या कामाची गुणनियंत्रक पथकामार्फत चौकशी करण्यात यावी आदी मागण्या साठी अर्धा तास रास्ता रोको करण्यात आला. या वेळी निलंगा-उदगीर, भालकी या रोडवर वाहतूक ठप्प झाली होती या रस्त्याचे काम लवकर चालू नाही केल्यास मुख्य अभियंता सा.बां.प्रादेशिक विभाग औरंगाबाद येथे बेमुदत आमरण उपोषण करण्यात येणार आहे. या आंदोलनात अन्याय अत्याचार, भ्रष्टाचार विरोधी समिती महाराष्ट्र, जय संघर्ष वाहनचालक सामाजिक संस्था, स्वाभिमान युवा मंच, शिवबसव फाउंडेशन, ह.टिपू सुलतान विचार मंच, मनसे इत्यादी संघटना सहभागी झाले होते या अंदोलनाचे नेतृत्व अन्याय अत्याचार भ्रष्टाचार विरोधी समितीचे संस्थापक अध्यक्ष महमद रफी सौदागर व सागीर मोमीन यांनी केले.

# देवणी येथे राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने विविध मागण्यासाठी आमरण उपोषण!



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी येथे राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने विविध मागण्यासाठी आमरण उपोषण सुरु असुण, तुरोरी ते तोगरी क्रॉस होणारा रस्ता अतिशय निष्कृट झाला असून या गुत्तेदार चा लायसन रद्द करावा व संबंधित शासकीय अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करावे. तसेच देवणी तालुक्यातील सर्व कर्मचारी व अधिकारी मुख्यालयी राहत नाहीत. म्हणून यांचा एक वर्षाचा पगार कपात करून कोरोणा काळात आरोग्य विभागाला देण्यात यावे देवणी येथील नगरपंचायतीचे मुख्याधिकारी व तसेच देवणी येथील भारतीय स्टेट बँकेला तात्काळ कायमस्वरूपी मॅनेजर देण्यात यावे, पंतप्रधान आवास योजनेचा तिसरा व शेवटच्या टप्प्यातील हप्ता तात्काळ लाभार्थ्यांच्या खात्यावर टाकण्यात यावे देवणी तालुक्यातील सर्व शासकिय कार्यालयाचे कर्मचारी व आधिकारी यांना तात्काळ मुख्यालय राहण्याचे बंधनकारक करावे व तसेच तालुक्यातील विविध मागण्या तात्काळ मंजूर करावे असे उपोषणकर्ते राष्ट्रीय समाज पक्षाचे आनंद जीवने यांची मागणी आहे.

# पालघर जिल्ह्याकरिता मत्स्यव्यवसाय प्रशिक्षणाचे सत्र 1 जुलै 2021 पासून सुरु

**पालघर/प्रतिनिधी**

वसई मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्रातून पालघर जिल्ह्याकरिता मत्स्यव्यवसाय प्रशिक्षणाचे सत्र दि. १ जुलै २०२१ पासून सुरु होणार आहे. सदर प्रशिक्षण हे सहा महिने मुदतीचे असून त्यात मत्स्यव्यवसाय नौकानयनाची मूलतत्त्वे, सागरी डीझेल इंजिनाची निरनिराळ्या भागाची माहिती व दुरुस्ती, मासेमारीची आधुनिक साधने, प्रात्यक्षिक इत्यादीचे प्रशिक्षण दिले जाते. सदर प्रशिक्षणा करिता दरमहा दारिद्रय रेषेवरील प्रशिक्षणार्थी यांचेकडून रु. ४५०/- व दारिद्रय रेषेखालील प्रशिक्षणार्थी कडून रु. १००/- शुल्क आकारले जाते. सदर प्रशिक्षणाकरिता उमेदवार किमान ४ थी पास व १८ ते ३५ वयोगटातील असावा. इच्छुक उमेदवाराने अर्ज विहित नमुन्यात मच्छिमार संस्थेचे शिफारसपत्र, शाळा सोडल्याचा दाखला व एक फोटोसहीत दि. ३०.०६.२०२१ पर्यत मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र वसई येथे वसई मच्छिमार सर्वोदय सहकारी संस्था इमारत पाचूबंदर वसई येथे पाठवावेत. अधिक माहिती करिता अजिंक्य पाटील, मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी वसई मो. नं. ९८९२१०३२३५ व श्रीकांत इंगळे ९४२०१८६८७० यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी वसई यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# महादेव मंदीराला तीर्थक्षेत्राचा दर्जा देणार -राहुल केंद्रे

**देवणी/शकिल मनियार**



मांजरा तिरावर सर्व धर्मीयांचे श्रध्दास्थान असलेले महादेव मंदीर जागृत देवस्थान आहे. नुकतेच साकारलेले धनेगाव बँरेज व सभोवतालचा परिसर पाहुन जिल्ह्यातील एक आकर्षक पर्यटन स्थळ होणार आहे. यासाठी आपण या मंदीराला तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे अभिवचन जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल केंद्रे यांनी बुधवारी धनेगावकरांना दिले. जिल्हाधिकारी यांच्या हस्ते वृक्षलागवड करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी, मुख्यकार्यकारी अधिकारी अभिनव गोयल, उपमुख्यकार्यकारी अधिकारी उदयसिंह सोळुंके, उपविभागीय अधिकारी विकास माने, अतिरिक्त सिईओ संतोष जोशी, जि.प.सदस्य पृथ्वीराज शिवशिवे, माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, प्रशांत पाटील, माजी सभापती सत्यवान कांबळे, सोमनाथ बोरोळे, तहसिलदार सुरेश घोळवे, गटविकास अधिकारी नितीन राऊत, सहाय्यक गटविकास अधिकारी अच्युत पाटील, कृषी अधिकारी शिरीष गनबहादुर यांनी तालुक्यातील धनेगाव महादेव मंदीर परिसर, स्मशान भुमीत मियावाकी, वलांडी येथील पोलिस चौकीतील मियावाकी, नागतीर्थवाडी येथे महिलांनी सः कल्प केलेल्या ११० वटवृक्षाचे रोपन, तळेगाव येथे बाला उपक्रमातंर्गत शाळेची व अंगृणवाडीची पहाणी, वृक्षलागवड पहाणी, आँक्सीजन हब ची पहाणी करुन ठिकठिकाणी मान्यवरांच्या हस्ते वृक्षलागवड करण्यात आली. धनेगाव येथे सरपंच मिना परिट, उपसरपंच कुमार पाटील, रामलिंग शेरे, वलांडी येथे सरपंच राणीताई भंडारे, राम भंडारे, प्रा.महेमुद सौदागर, सपोनि पंकज शिनगारे, नागतीर्थवाडी येथे राजकुमार गुणाले तर तळेगाव येथे उपसभापती शंकरराव पाटील, सरपंच सदाशिवराव पाटील, ग्रामसेवक इश्वर मुर्के, श्रीकांत पताळे, श्रीकांत गोरे यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी पुढाकार घेतले.

# सांगोला पोलिसांनी गायगव्हाण येथे ६९ लाखांचा गांजा जप्त



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातील गायगव्हाण येथे सांगोला पोलिसांनी ३१८ किलो गांजासह ६९ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आली आहे. याप्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक नागेश यमगर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चालक कुमार पांडुरंग जाधव आणि वाहन मालक सोमनाथ सुरेश कांबळे यांच्या विरोधात सांगोला पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रविवारी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास कुमार जाधव हा महिंद्रा पिक अप मधून गांजाची पोती घेऊन पंढरपूर कडून महूद बु ।। येथे येणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. मंगळवेढा च्या उपविभागीय पोलीस अधिकारी राजश्री पाटील याही सदर ठिकाणी कारवाईकामी हजर होत्या. कारवाई करण्यासाठी पंढरपूर ते महूद रोडवर पोलीसांची दोन पथके तयार करून त्यापैकी एक पथक जय तुळजाभवानी हॉटेलच्या पूर्वेस पंढरपूर रोडवर तर दुसरे पथक हॉटेलच्या समोर थांबले. पंढरपूर कडून येणाऱ्या वाहनांची वाट पाहत असताना मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास एक वाहन वेगाने महूद कडे येताना दिसले. सदर वाहनास पहिल्या पथकाने थांबविण्याचा इशारा केल्याने सदर पिकअप दुसरे पथक ज्या ठिकाणी होते त्या ठिकाणी हॉटेलसमोर थांबले यावेळी पोलिसांनी वाहन चालकास पिकअप मध्ये काय माल आहे असे विचारले असता चालकाने रिकामे मोकळे कॅरेट असल्याचे सांगितले. यावेळी पोलिसांनी सर्व मोकळे कॅरेट वाहनातून बाहेर काढले असता आत मध्ये ताडपत्रीत झाकून ठेवलेली गांजाची ११ पोती आढळून आले. पोलिसांनी सुमारे ६३ लाख ६१ हजार ९०० रुपयांचा ३१८ किलो गांजा व ६ लाखांचे वाहन असा एकूण ६९ लाख ६२ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. कुमार जाधव व सोमनाथ कांबळे यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. पिकअप चालकास ताब्यात घेण्यात आला आहे.

ही सदरची कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी राजश्री पाटील, सांगोला पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुहास जगताप, सहाय्यक पोलीस निरीक्षक नागेश यमगर, फौजदार संदेश नाळे, सहाय्यक फौजदार कल्याण ढवणे, दत्तात्रय तोंडले, पो.ह.झोळ, अप्पाराव पवार, सुनील मोरे, अभिजित साळुंखे, क्षीरसागर, नदाफ, लोंढे, जमीर मुजावर, सुमित पिसे यांनी केले आहे.

# धबधबे, तलाव, धरणे, किल्ले आणि समुद्र किनारी मनाई आदेशाचे नागरीकांनी काटेकोरपणे पालन करण्याचे आदेश!

**पालघर/प्रतिनिधी**

जिल्ह्यामध्ये मान्सून कालावधीत धबधबे, तलाव, धरणे, किल्ले व समुद्र किनारी पर्यटक मोठ्या संख्येने येत असतात व त्या ठिकाणी जिवीतहानी होण्याच्या घटना घडत असतात. तसेच सद्या कोरोना विषाणूंचा संसर्ग व प्रादुर्भाव लक्षात घेता, धबधबे, तलाव, धरणे, किल्ले व समुद्र किनारी जाण्यासाठी मनाई आदेश जारी करण्यात आला असुन मनाई आदेशाचे नागरीकांनी काटेकोरपणे पालन करावे असे आवाहन अपर जिल्हादंडाधिकारी डॉ.किरण महाजन यांनी केले. पावसाळयात पालघर जिल्ह्यामध्ये असलेले धबधबे, तलाव, धरणे, किल्ले व समुद्र किनारी या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पर्यटक पर्यटनासाठी आल्याने गर्दी होण्याची व सामाजिक अंतर राखले न जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या ठिकाणी पर्यटकांची सुरक्षा अबाधित रहावी व कोणत्याही प्रकारची जिवीतहानी होऊ नये म्हणून दि.१०/०६/२०२१ रोजीच्या आदेशान्वये फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ५१(ल) अन्वये दि.११/०६/२०२१ ते दि.०८/०८/२०२१ पर्यत पालघर जिल्ह्यातील वसई तालुका वगळून उर्वरीत ७ तालुक्यांच्या क्षेत्रातील सर्व धबधबे, तलाव, धरणे, सर्व किल्ले व समुद्र किनाऱ्यावर जाण्यास मनाई आदेश लागू केलेला असल्याचे अपर जिल्हादंडाधिकारी डॉ.किरण महाजन यांनी सांगितले. या मनाई आदेशाचे सर्व नागरीकांनी काटेकोरपणे पालन करावे, असे हि आवाहन अपर जिल्हादंडाधिकारी डॉ.किरण महाजन यांनी केले आहे.

## कोकण विभागात २७.०९ मि.मी. पावसाची नोंद

**नवी मुंबई/प्रतिनिधी**

कोकण विभागात दि.२४ जून २०२१ रोजी सरासरी २७.०९ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. सर्वाधिक पावसाची नोंद रत्नागिरी जिल्हयात ५४.०७ मि.मी. झाली आहे. कोकण विभागात आत्तापर्यंत एकूण ७६५.०७ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. जिल्हानिहाय पावसाची आकडेवारी पुढीलप्रमाणे ठाणे-१०.०२ मि.मी., पालघर-०७.०७ मि.मी, रायगड-२२.०३ मि.मी., रत्नागिरी -५४.०७ मि.मी., सिंधुदुर्ग-२१.०१ मि.मी.

# शिवकुमार हिप्परगे यांची सरपंच सेवा महासंघाच्या तालुकाध्यक्ष पदी निवड

**अहमदपूर/प्रतिनिधी**

सरपंच सेवा महासंघ अहमदपूर तालुकाध्यक्ष म्हणून अहमदपूर तालुक्यातील परचंडा ग्रामपंचायत येथील सरपंच शिवकुमार राजेंद्र हिप्परगे यांची नियुक्ती करण्यात आली. ही संघटना सरपंचाच्या न्याय व हक्कासाठी लढणारी महाराष्ट्रातील एकमेव नोंदणीकृत संघटना आहे. आज पर्यत राज्य कार्यकारिणीने शासनस्तरावर विविध मागण्या मंजूर करून घेतल्या हे उल्लेखनीय आहे. ग्रामपंचायत निवडणूक होऊन फक्त चार महिने झाले व या चार महिन्यातच परचंडा गावामध्ये विकासाचे आनेक कामे होत आहेत.डिजिटल शाळा, वैशिष्ट्य पूर्ण ग्रामपंचायत, १००% नळ योजना, स्वच्छ परचंडा सुंदर परचंडा, ११०० अकराशे झाडे लोकसहभागातून लावली व त्याची संगोपनाचे काम त्यानंतर गावातील स्वच्छता, पेवर ब्लॉक, कोरोना मुक्त गाव (कोरोना किट, फवारणी, प्रबोधन १००% लसीकरण, तपासणी) दलित वस्तीतील कामे,चार महिन्यात ६ बोर पाडून पाणीप्रश्न सोडविला व गावातील लोकांचा चांगला संपर्क व त्यांची कामे करण्याचा चंग बांधला आहे तसेच प्रशाशनावरील चांगली पकड या कामाची दखल घेऊन सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य यांनी तालुका अध्यक्ष पदाची जबाबदारी दिली आहे. अहमदपूर तालुक्यातील परचंडा ग्रामपंचायत पंचायत येथील सरपंच त्यांच्या कामाचा संघटना वाढीसाठी अनुभव बघता त्यांच्या खांद्यावर तालुकाध्यक्ष पदाची जबाबदारी राज्य कार्यकारिणी च्या सल्लयानुसार सरपंच सेवा महासंघ संस्थापक राज्याध्यक्ष पुरुषोत्तम अंबादास घोगरे, राज्य संपर्कप्रमुख राहुल मारोतराव उके यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देउन तालुकाध्यक्ष जबाबदारी देण्यात आली. ते आपल्या नियुक्तीचे श्रेय सरपंच सेवा महासंघ महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक राज्याअध्यक्ष पुरुषोत्तम घोगरे, कार्याध्यक्ष माधवराव गंभीरे, राज्य संपर्कप्रमुख राहुल उके, कोअर कमिटी अध्यक्ष पंजाबराव चव्हाण, ज्योती अवघड, राज्य कार्यकारिणी सदस्य सतिश साखरे, अमरावती विभागीय अध्यक्ष कल्याण साबळे, विभागीय कार्याध्यक्ष अयुब खान पठाण, राज्य कार्यकारिणी सदस्य भाऊसाहेब गिराम सोशल मीडिया प्रमुख भाऊसाहेब कळसकर, सरपंच माझा चे संचालक रामनाथ बोर्हाडे यांना देत आहे. त्यांच्या या नियुक्ती मुळे सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षाव व स्वागत होत आहे.



# थोडक्यात वृत्तांत

## अवैध रेती उत्खनन तक्रार निवारण कक्ष स्थापन

पालघर : पालघर जिल्हयातील अवैध वाळू-रेती उत्खनन व वाहतूक संबंधि माहिती देणे, तक्रार करणे या करिता जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे तक्रार निवारण कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. नागरिकांना विनंती करण्यात येते की, कोठेही अवैध गौणखनिज आढळल्यास सदर अवैध वाळू-रेती उत्खनन व वाहतूक संबंधि आपली काही तक्रार असल्यास या कक्षाशी लेखी अथवा दुरध्वनीव्दारे संपर्क करावा. (तक्रार कर्त्याचे नाव गोपनिय ठेवण्यात येईल) तक्रार कक्षाचा पत्ता व संपर्क क्रमांक पुढीलप्रमाणे. पत्ता : अवैध वाळू- रेती उत्खनन तक्रार निवारण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर पार्श्वनाथ ९, बिडको नाका, पालघर (पश्चिम) पालघर ४०१४०४ संपर्क क्रमांक ०२५२५-२९७४७४ मोबाईल क्र. ९३५९८५५५९७ टोल फ्री क्रमांक १०७७. Email ID: miningpalgharhogmail.com.

## औश्यात विविध विकास कामाचा शुभारंभ

औसा :औसा नगर परिषदेच्या विविध विकास कामाचा शुभारंभ व लोकार्पण सोहळा जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांच्या हस्ते आज करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी मंत्री बसवराज पाटील होते. या कार्यक्रमासाठी सामाजिक न्याय मंत्री धनजंय मुंडे, पाणीपुरवढा राज्य मंत्री संजय बनसोडे, यांची प्रमुख उपस्थिती होती. किल्ला परिसर येथील नवीन जलकुंभ, तसेच बसस्थानका समोरील नूतन व्यापारी संकुलाचा लोकार्पण सोहळा आणि जमाल नगर तलाव सुशोभीकरण, मुक्तेश्वर तलाव सुशोभीकरण, तलावातील बोटींग सेवा आणि शहरातील विविध ठिकाणी सुरू असलेल्या कामाचा शुभारंभ करण्यात आला यावेळी औसा नगरीचे नगराध्यक्ष अफसर शेख, उपनगराध्यक्ष जहाँअरा तत्तापुरे, जि प सदस्य नारायण आबा लोखंडे, माजी नगराध्यक्ष सुनील मिटकरी, आ.विक्रम काळे, नगरसेवक अंगद कांबळे, जयराज कसबे, पंचायत समिती माजी सदस्य बसवराज धाराशिवे आदिंची उपस्थिती होती.

## कागदपत्रे अपलोड करण्यासाठी मुदत वाढ

लातूर : प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेअंतर्गत सन २०२१-२२ मध्ये ठिबक तूषार संचाच्या अनूदानासाठी महाडिबीटी प्रणालीवर लातूर जिल्हयातील आज अखेर ७ हजार ५७३ लाभार्थ्यांची लॉटरीव्दारे निवड झालेली आहे. त्यापैकी २ हजार ७७९ लाभार्थ्यांने कागदपत्रे अपलोड केलेले आहेत व उर्वरित ३ हजार ५०८ लाभार्थ्यांनी कागदपत्रे अपलोड केलेली नाहीत. कागदपत्रे अपलोड करण्यासाठी जून २०२१ अखेर पर्यंत मूदत देऊन विहित कालावधीत अपलोड न केल्यास असे अर्ज महाडिबीटी पोर्टल मधून रद्द करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.ज्या लाभार्थ्यांची लॉटरीव्दारे निवड झालेली आहे. ज्यांनी महाडिबीटी पोर्टलवर कागदपत्रे अपलोड केलेले नाहीत अशा सर्व शेतकऱ्यांनी जून २०२१ अखेर पर्यंत तात्काळ कागदपत्रे अपलोड करण्यात यावीत अन्यथा कागदपत्रे अपलोड न केलेल्या लाभार्थ्यांनी निवड रद्द करण्यात येईल, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी डिएस.गावसाने यांनी एका प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

## मुरघास निर्मिती लाभार्थ्यांनी अर्ज करावेत

लातूर : राष्ट्रीय पशुधन अभियान (अनुसुचित जाती उपयोजना) अंतर्गत मुरघास निर्मिती करीता लातूर जिल्हयामध्ये ०१ सायलेज बेलर युनिट स्थापनेसाठी दि.१ जूलै ते १५ जूलै २०२१ या कालावधीत लाभार्थी निवड प्रक्रीयेसाठी अर्ज मागवण्यात येत आहेत. सदर अर्जाचा नमुना पशुधन विकास अधिकारी (वि) पंचायत समिती यांच्याकडे उपलब्ध करुन देण्यात आला आहे.लातूर जिल्हयातील अनुसूचित प्रवर्गातील सहकारी दुध उत्पादक संस्था / संघ, शेतकरी उत्पादक कंपनी / संस्था, स्वंयसहाय्यता बचत गट तसेच अनुसूचित प्रवर्गातील गोशाळा/ पांजरपोळ / गोरक्षण संस्था यांना अर्ज भरता येईल. सदर योजनेसाठी एका युनिटसाठी रु. २० लक्ष खर्चा पैकी ५० टक्के रु. १० लक्ष केंद्रशासनाचे अर्थसहाय्य असुन उर्वरित ५० टक्के रु. १० लक्ष संस्थेने खर्च करावयाचे आहे. योजनेच्या लाभासाठी रु. १० लक्ष निधी खर्च करण्याची आर्थिक क्षमता असणे आवश्यक आहे.संस्थेने , लाभार्थ्यांने मशीनरीची (सायलेज बेलर,किमान २ मे.टन. प्रति तास क्षमतेचे हेवी डयुटी कडबाकुट्टी यंत्र, ट्रॅक्टर व ट्रॉली,वजन काटा,हार्वेस्टर,मशीन शेड) खरेदी केल्यानंतर पडताळणी करुन निधी संस्थेच्या, लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये वर्ग करण्यात यईल, असे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, डॉ.नानासाहेब सखाराम कदम यांनी एका प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

## राजमाता जिजामाता विद्यालयाचे यश

लातूर : गुणवत्तेची परंपरा कायम ठेवणार्या येथील शिवनगरातील राजमाता जिजामाता विद्यालयाच्या तीन विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत यश मिळविले असून या विद्यार्थ्यांचे संस्थेच्यावतीने कौतूक करण्यात आले. सन २०२० - २०२१ मध्ये घेण्यात आलेल्या राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेत राजमाता जिजामाता विद्यालयाच्या आदिती व्यंकट शिंगडे, गायत्री उमेश शिंदे व पद्माकर जगन्नाथ येंचेवाड यांनी यश मिळविले आहे. या यशाबद्दल केंद्रे चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, मुख्याध्यापक संगमेश्र्वर केंद्रे, पर्यवेक्षक आर. डी. बिरादार, मदन धुमाळ, पांडुरंग कुलकर्णी, शोभा कांबळे, राजेंद्र जायेभाये, परमेश्र्वर गित्ते यांनी यशस्वी विद्यार्थी आणि मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

## गंजगोलाई ते बाभळगाव वाहतूक सेवेचा शुभारंभ

लातूर : लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने सुरू करण्यात येत असलेल्या गंजगोलाई ते छत्रपती शाहू महाराज चौक, स्वामी विवेकानंद चौक, म्हाडा वसाहत मार्गे बाभळगाव या मार्गावरील लातूर शहर वाहतूक बस सेवेचे विस्तारीकरण करण्यात आले. बाभळगाव बसस्थानक या ठिकाणी या सेवेचा शुभारंभ राज्याचे वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतीक कार्यमंत्री तथा लातूरचे पालकमंत्री अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून आज सकाळी करण्यात आला. लातूर शहर व परिसरातील नागरीकांना माफक दरात प्रवाशी सेवा उपलब्ध व्हावी या दृष्टीने लातूर शहर महानगरपालिकेकडून शहर वाहतूक बस सेवेची सुरुवात केली गेली. या बस सेवेचे विस्तारीकरण व्हावे अशा सूचना पालकमंत्री अमित देशमुख यांनी दिल्या नंतर या अनुषंगाने गंजगोलाई ते वासनगाव - गंगापूर बससेवेचा विस्तार केला गेला. यावेळी मनपा महापौर विक्रांत गोजमगुंडे, आयुक्त अमन मित्तल, सरपंच प्रिया मस्के, उपसरपंच गोविंद देशमुख, पुनीत पाटील, ॲड. समद पटेल, सचिन गंगावणे यांच्यासह मनपा पदाधिकारी, सदस्य, नागरिक उपस्थित होते.

# सरकार पळ काढतेय!

कोरोनाच्या बहाण्याने सध्या कोण काय करील याचा नेम नाही. पूर्वी लोक एखाद्या गोष्टीची अफवा पसरवायचे पण आता सरकारच कोरोनाच्या तिसऱ्या-चौथ्या लाटेची अफवा पसरवत आहे. जेणेकरून कोणी घराबाहेर पडू नये. अरे पण ज्यांची घरे भरलेली आहेत त्यांना लॉकडाऊन किंवा कठोर निर्बंधाचा फरक पडत नाही. पण जो सामान्य माणूस आहे, ज्याचं हातावर पोट आहे तो मात्र यात भरडला जातोय आणि त्याचे प्रश्न त्याची वेदना ज्या विधिमंडळाच्या अधिवेशनात मांडायच्या होत्या त्या अधिवेशनालाही सरकारने कात्री लावली. विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन फक्त दोन दिवस घेतले जाणार आहे. त्यात प्रश्नोत्तराचा तास नसेल, लक्षवेधी नसेल आणि तारंकित प्रश्नांना सुद्धा परवानगी नसेल. मग हे दोन दिवसाचे अधिवेशन नेमके कशासाठी घेतले जातेय तेच कळत नाही. मुंबईत आता कोरोनाचा प्रादुर्भाव मंदावला आहे, पॉझेटिव्हीटी रेट ३६.७९ टक्क्यांवर आला आहे. ऑक्सिजन बेडची संख्या कमी झालीय. इतकेच नव्हे तर कोरोना रुग्णांची संख्याही कमी झालेली असल्याने काही कोव्हीड सेंटर सुध्दा बंद करण्यात आली आहेत. शिवाय लसीकरण सुद्धा वेगाने सुरू असून त्याला नागरिकांचाही चांगला प्रतिसाद मिळतोय. असे सर्व काही हळूहळू पूर्वपदावर येत असताना सरकारलाच कसली भीती वाटतेय? शिवरायांचा महाराष्ट्र आज अशा डरपोक लोकांच्या हाती आहे जे खुर्चीवर बसून स्वतःही गारठले आणि दुसऱ्यांनाही घाबरवत आहेत. त्यामुळेच महाराष्ट्रातील साडेबारा कोटी लोक पारतंत्र्यात असल्यासारखे गुलामीचे जीवन जगत आहेत. लोकांच्या सेवा सुविधा काढून घेणे त्यांना जबरदस्तीने घरात बसवणे त्यांच्या मुलाबाळांवर उपासमारीची पाळी आणणे या सगळ्या गोष्टी पाहता खरोखरच हा शिवरायांचा लाढवय्या महाराष्ट्र आहे का? असा प्रश्न पडतोय. आज महाराष्ट्रासमोर अनेक गंभीर प्रश्न आहेत. कोरोनाचे थोड फार संकट तर आहेच. पण शेतकऱ्यांचे प्रश्न आहेत. कोरोनामुळे शिक्षण बुडत असल्याने मुलांच्या शैक्षणिक भवितव्याचा प्रश्न आहे, लॉकडाऊनमुळे बंद पडलेल्या उद्योग धंद्यांचा आणि रोजगार गेल्याने बेरोजगार झालेल्या लाखो बेरोजगारांच्या प्रश्न आहे. अनलॉक प्रक्रियेअंतर्गत काही प्रमाणात उद्योग धंदे सुरू झालेत. पण बाहेरगावाहून मुंबईत कामाला येणाऱ्या कामगारांना लोकल ट्रेनच्या प्रवासात मनाई असल्याने लोकांचे हाल सुरू आहेत. म्हणे कोरोना गेल्याशिवाय लोकल ट्रेन सुरु करणार नाही असे उद्दम विधान एका मंत्र्याने केलाय. म्हणजे कोरोना वर्षभर गेला नाही तर वर्षभर लोकल ट्रेन सर्वसामान्य लोकांना बंद ठेवणार आहात का? या सगळ्या प्रश्नांवर विधिमंडळात चर्चा होणे आवश्यक होते. पण सरकारने चर्चे पासून पळ काढला. त्यामुळे आता महाराष्ट्रातील या ज्वलंत विषयावरील प्रश्नांची चर्चा कुठे आणि कशी करायची असा सवाल संपूर्ण महाराष्ट्र सरकारला विचारतोय. मागच्या वेळेस सुद्धा असाच प्रकार घडला. पण त्या वेळची परिस्थिती खरोखरच गंभीर असल्याने अधिवेशन लवकर गुंडळल्याबद्दल कुणाची फारशी तक्रार नव्हती. पण यावेळी तसे नाही. ज्या मुंबईत पावसाळी अधिवेशन होणार आहे तिथली स्थिती आता बऱ्यापैकी सुधारलेली असल्याने किमान आठवडाभर तरी अधिवेशन चालवायला हवे. आणि आठवडाभर अधिवेशन चालवले तर सगळे आमदार काही कोरोना बाधित होणार नाहीत आणि तसे पाहता सामान्य माणूस असो की लोकप्रतिनिधी प्रत्येकाला आपला जीव प्यारा आहे. त्यामुळे प्रत्येकजण स्वतःच्या तब्येतीची काळजी घेतोय. त्यामुळे अधिवेशनास आलेल्या सर्व आमदारांना कोरोना होईल ही भीती सरकारने मनातून काढून टाकायला हवी. दोन दिवसांच्या अधिवेशनात राज्यासमोरील महत्वाच्या प्रश्नावर चर्चा होणार आहे का? आज मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा प्रश्न सरकारच्या अवघड जागेवरच दुखणं बनलाय. मराठा मोर्चाने तर विशेष अधिवेशनाची मागणीही केलीय. पण जिथे प्रमुख अधिवेशने सुद्धा घेताना सरकार लटपटताय तिथे विशेष अधिवेशन कसे घेणार? सध्या सरकारचा कारभार डॉक्टरांच्या टास्क फोर्सच्या सल्ल्यानुसार चाललाय. त्यामुळे राज्याचा खेळखंडोबा झालाय. मात्र एखादी आवश्यक गोष्ट करता आली नाही तरी ती केल्याचा देखावा निर्माण करायचा आणि लोकांच्या डोळ्यात धूळफेक करायची हे सरकारचे धोरण असल्याने पावसाळी अधिवेशन दोन दिवस का होईना आम्ही घेतले हे दाखवण्यासाठी या दोन दिवसांच्या पावसाळी अधिवेशनाचा फार्स आहे. महाराष्ट्र म्हणजे काही युपी बिहार नाही. या राज्यातले लोक सुशिक्षित आहेत. त्यांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घडामोडींची सुधा जाण आहे. त्यामुळे सरकार कुठल्याही पक्षाचे असो आपण लोकांना सहज फसवू शकतो. असे जर सत्तेत बसलेल्या लोकांना वाटत असेल तर तो त्यांचा गैरसमज आहे. कोरोनाची ढाल करून सरकार स्वतःला वाचवण्याचा प्रयत्न करीत आहे. कारण विधीमंडळाचे अधिवेशन जर जास्त दिवस चालवले तर सरकारला गैरसोयीचे ठरणारे प्रश्न अधिवेशनात उपस्थित केले जातील आणि त्यावर चर्चा करणे सरकारला भाग पडेल. खास करून मराठा आरक्षण आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावर सरकारकडे कोणतेही उत्तर नसल्याने विरोधकांना काय जवाब द्यावा असा सरकार समोर प्रश्न आहे. म्हणूनच अधिवेशन अवघ्या दोन दिवसात गुंडाळण्याचा सरकारने घाट घातलाय. मात्र या दोन दिवसात राज्यातील कोणत्याही महत्वाच्या प्रश्नावर चर्चा होणार नाही. त्यामुळे हे अधिवेशन म्हणजे एक प्रकारची धूळफेक आहे.

# कोरोना वाढवणारी जीवघेणी आंदोलने!



**संध्या स्ट्रोक**

**सोनू जाधव**

सध्या कोरोनाच्या संकट काळ सुरू आहे आणि कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सरकार व सर्व प्रशासकीय यंत्रणा प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहे. अशावेळी लोकांनीही आपली जबाबदारी ओळखून सरकारच्या सूचनांचे पालन करायला हवे. कोरोना हा अत्यंत संवेदनशील संसर्गजन्य रोग असल्याने त्याचा झपाट्याने प्रादुर्भाव होतोय. एक कोरोना बाधीत जर गर्दीत मिसळला तर तो ४०० लोकांना बाधित करू शकतो असे दस्तुरखुद्द मुख्यमंत्र्यांनी सांगितलेले आहे. असे असतानाही लोक कोरोनाच्या या संकट काळात रस्त्यावर उतरून आंदोलन करीत आहेत आणि हीच आंदोलने पुढे कोरोनाच्या फैलावास कारणीभूत ठरणार आहेत आणि त्याची उदाहरणे सुधा आपल्या डोळ्यासमोर आहेत. दिल्लीतील मुस्लिम बांधवांच्या मर्काजमुळे भारतात कोरोना फैलावला होता.

या मरकाजला देश विदेशातून तीन हजार लोक हजर होते आणि कार्यक्रम संपल्यावर ते देशाच्या विविध भागात त्यांच्या नातेवाईकांकडे गेले आणि त्यांनी कोरोना पसरवला मात्र हे सगळं ठाऊक असतानाही या देशातील काही लोक सोशल डिस्टंन्सिंगचे नियम पाळायला तयार नाहीत. रस्त्यावर उतरून आंदोलन करीत आहेत आणि या अशा आंदोलनात लाखोंची गर्दी जमते आहे.

कोरोनाच्या फैलावासाठी हे सगळ पोषक वातावरण आहे. म्हणजे एकीकडे सरकारने तसेच आमच्या कोरोना योद्धांनी जीवाचे रान करून कोरोनाशी संघर्ष करून लोकांचे प्राण वाचवायचे तर दुसरीकडे जात, धर्म, प्रांत, अस्मिता अन्यायाविरुद्ध आंदोलने या सगळ्या गोष्टींचा माध्यमातून रस्त्यावर उतरून गर्दी करायची, मग अशा स्थितीत आपण, आपले राज्य आणि आपला देश कसा कोरोना मुक्त होईल? सध्या महाराष्ट्रात मराठा आणि ओबीसी आरक्षणासाठी लोक रस्त्यावर उतरून आंदोलन करीत असतानाच आता नवी मुंबईतील नियोजित विमानतळाला नाव देण्यावरून आंदोलन सुरू झाले आहे. त्यासाठी हजारो लोक रस्त्यावर उतरले होते त्यांनी प्रचंड गर्दी केली होती. त्यामुळे अशा गर्दीत १०० कोरोना बाधित लोक जरी मिसळले तरी काय होऊ शकेल याची कल्पनाही करता येणार नाही. का विनाकारण लोक स्वतःचा जीव धोक्यात घालून कोरोनाचा प्रादुर्भाव वाढवण्यास कारणीभूत ठरत आहेत? किमान ही वेळ आंदोलने करण्याची नाही तर कोरोनापासून स्वतःच, आपल्या कुटुंबाचं आणि समाजाचं रक्षण करण्याची ही वेळ आहे. तेंव्हा थोडे दिवस आपल्या भावनांना लोकांनी मुरड घालायला हवी. नवी मुंबई विमानतळाला काय नेत्यांचे च नाव द्यायला हवे होते का? त्या विमानतळाला नवी मुंबई विमानतळ हेच नाव ठेवलं असतं तर त्यावरून विमाने चालली नसती का?कशासाठी हा नावांचा अट्टाहास? शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि लोकनेते दी.बा.पाटील या दोन्ही नेत्यांबद्दल महाराष्ट्रातील जनतेला आदर आहे.

बाळासाहेबांचे कार्य तर जगजाहीर आहे. त्याच बरोबर दि.बा.पाटील यांनी सुद्धा स्थानिक भुमिपुत्रांसाठी केलेले कार्य लोक विसरलेले नाहीत. मात्र अशा महान नेत्यांना नावातून नव्हे तर चांगल्या कामातून आदरांजली वाहायची असते. पण लोकांना नेमकी हीच गोष्ट कळतं नाही. आज हे दोन्ही नेते हयात असते तर त्यांनी कोरोनाविरूद्धच्या लढ्यात स्वतःला झोकून दिले असते आणि शेकडो लोकांचा जीव वाचवला असता. शिवाय नवी मुंबई विमानतळाला कोणाचे नाव द्यायचे यावर वाद ही घातला नसता. वाईट फक्त एकच गोष्टीचे वाटते आणि ते म्हणजे या देशातील लोक कर्तव्या पेक्षा भावना आणि वेगवेगळ्या प्रकारच्या अस्मिताना अधिक महत्व देतात. आज जे लोक नवी मुंबई विमानतळाला दी.बा. पाटलांचे नाव देण्याच्या मागणीसाठी हजारोंच्या संख्येने एकत्र जमलेत तेच लोक जनतेच्या दैनंदिनी गरजांच्या प्रश्नांवर एकत्र येणार नाहीत. कोरोनाची भीती दाखवून सरकारने मुंबईची लोकल ट्रेन सर्वसामान्यांसाठी बंद करून ठेवली आहे. त्यामुळे मुंबईतील आणि मुंबई बाहेरून कामाधंद्यासाठी मुंबईत येणाऱ्या लोकांचे अतोनात हाल होत आहेत. नाईलाजाने त्यांना रोज कामाला जाता येता एसटी बसमध्ये सहा तास ताटकळत प्रवास करावा लागतोय. त्यामुळे लोकल ट्रेन सर्वसामान्यांसाठी खुली करण्याच्या मागणीसाठी इतके लोक सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरले असते, तर सरकारला लोकल ट्रेन सर्वसामान्यांसाठी खुली करावी लागली असती आणि त्यामुळे लाखो लोकांचं फायदा झाला असता.

आपल्या मागण्यांसाठी लोकांनी आंदोलने जरूर करावीत तो त्यांना लोकशाहीने दिलेला अधिकारच आहे. पण कुठल्या विषयावर कधी आंदोलन करायचे आणि अशा आंदोलनातून लोकांचे दैनंदिनी प्रश्न सुटणार आहेत का? याचा विचार करूनच आंदोलने करायला हवीत. सध्याच्या कोरोनाच्या संकटकाळात मराठा आंदोलन असो, ओबीसी आंदोलन असो की नवी मुंबईतील विमानतळाच्या नावासाठी सुरू असलेले आंदोलन असो, या आंदोलनाचे कुणालाही समर्थन करता येणार नाही. कारण ही आंदोलने चुकीच्या वेळेस केली जात आहेत आणि आंदोलनाच्या निमित्ताने होणाऱ्या या गर्दीमुळे जर कोरोना अधिक फैलावला तर आंदोलनाचे आयोजक याची जबाबदारी घेतली का? याचे उत्तर त्यांनी द्यावे आणि नंतरच आंदोलने करावीत.

**मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३**

# छत्रपती शाहू महाराज: लोककल्याणकारी राजा!

**२६ जून रोजी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म झाला. शाहू महाराजांनी त्यांच्या संपूर्ण जीवन कार्यात लोककल्याणाचे व समाज उद्धाराचे कार्य केले. महाराष्ट्र शासनामार्फत हा दिन संपूर्ण राज्यात सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो. तसेच राज्य शासन सामाजिक न्याय विभागामार्फत विविध लोककल्याणकारी योजना राज्यातील गोरगरीब व सर्वसामान्य नागरिकांसाठी राबवत आहे. शाहू महाराजांनी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक क्षेत्रात केलेल्या कार्याची महती...**



छत्रपती शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंतराव जयसिंगराव घाटगे यांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कागलच्या जहागीरदार घाटगे घराण्यात जयसिंगराव आणि राधाबाई ह्या दांपत्याच्या पोटी झाला. चौथ्या शिवाजींच्या अकाली निधनानंतर ते कोल्हापूरच्या गादीवर दत्तक गेले (१७ मार्च १८८४) छत्रपती शाहू महाराजांवर महात्मा फुले व सत्यशोधक समाजाचा मोठा प्रभाव होता. छत्रपती शाहू महाराज हे सामाजिक चळवळीच्या क्षेत्रातील महात्मा फुले यांचे खरेखुरे वारसदार होते. सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्तानला आवश्यकता आहे असे सांगून त्यांनी कोल्हापूर संस्थानात शिक्षणासाठी सवलती जाहिर केल्या.महाराष्ट्राने छत्रपती शाहू महाराजांचा शेतकऱ्यांचा खरा राजा म्हणून गौरव केला. भारतातील वस्तीगृहाचे आद्य जनक म्हणून छत्रपती शाहू महाराजांचा गौरव केला जातो. ते कल्याणकारी राजा होते. एप्रिल १९१९ भारतात बहुजन समाजाच्या उद्धाराचे कार्य करणाऱ्या अखिल भारतवर्षीय क्षत्रिय महासभा या संस्थेच्या कानपुर येथे भरलेल्या १३ व्या अधिवेशनात शाहू महाराजांना त्यांच्या कार्याबद्दल राजर्षी ही पदवी बहाल करण्यात आली. ग्रामीण भागातून शहरी भागात शिकण्यास येणाऱ्या विविध जाती-धर्माच्या गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जातीची वस्तीगृह स्थापन शाहू महाराजांनी केली. तर सन १९०१ मध्ये मराठा विद्यार्थ्यासाठी विक्टोरिया मराठा बोर्डिंग ची स्थापना कोल्हापूर येथे केली. तर नाशिक येथे उदोजी विद्यार्थी वस्तीगृह उभारून शहरी भागात विद्यार्थ्यांच्या राहण्याची व्यवस्था केल्याने त्या गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे शक्य झाले. सन १९०२ मध्ये शाहू महाराजांनी राज्यातील मागासवर्गीयांसाठी प्रशासकीय सेवा मध्ये ५० टक्के जागा राखीव ठेवल्या. तसेच महाराजांनी १५ नोव्हेंबर १९०६ किंग एडवर्ड मोहमेडन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. सन १९०७ मध्ये मिस क्लार्क बोर्डिंग हाऊस ची स्थापना अस्पृश्य विद्यार्थ्यासाठी करून त्या विद्यार्थ्यांच्या राहण्याची व्यवस्था केली. सन १९११ मध्ये कोल्हापूर संस्थानात जाहीरनामा काढून त्यानुसार १५ टक्के विद्यार्थ्यांना नादारी देण्याची घोषणा करून गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची दारे खुली केली.शाहू महाराजांनी १९११ मध्ये शिक्षक प्रशिक्षण व शिक्षकांसाठी मेरीट प्रमोशन योजना राबवले. तर १९१७ मध्ये आदेश काढून माध्यमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. व कोल्हापूर संस्थानातील गोरगरीब घरातील मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. १४ फेब्रुवारी १९१९ पाटील शाळा व त्याला जोडून तलाठी वर्ग सुरू करण्याचा जाहीरनामा काढला. बहुजन समाज शिकून शहाणा झाल्याशिवाय त्यांचे दारिद्र, अज्ञान व अंधश्रद्धा नष्ट होणार नाहीत, हे जाणून शाहूंनी शिक्षणाच्या, विशेषतः प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारावर भर दिला. त्यानुसार त्यांनी आपल्या संस्थानात सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला आणि तो अमलात आणला. प्रत्येक खेड्यात प्राथमिक शाळा सुरू केली. प्राथमिक शिक्षणावर या संस्थानात होणारा खर्च मोठा होता. लष्करी शिक्षणासाठी इन्फंट्री स्कूल सुरू केले व पुणे येथे श्री शिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूल तर जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिट्यूटची स्थापना करून शाहू महाराजांनी तांत्रिक शिक्षणाला महत्त्व देण्याबरोबरच लष्करी शिक्षणाची दारे खुली केली.शाहू महाराजांनी सन १९१७ मध्ये विधवा विवाहाचा कायदा करून पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता दिली तर १९१८ मध्ये आंतरजातीय विवाहास मान्यता देणारा कायदा केला. व समाजातील अनिष्ठ चाली-रीती वर हल्ला चढवला. १९१८ मध्ये महार वतने रद्द करून जमिनी रयतवारी ने करून दिल्या व वेठबिगारी प्रथा कायद्याने बंद केली व १९२० मध्ये माणगाव अस्पृश्यतानिवारण परिषदेचे आयोजन केले. छत्रपती शाहू महाराज यांनी व्यवसाय निर्बंध दूर करून अस्पृश्यांना व्यवसाय स्वातंत्र्य दिले. जातिभेदास तीव्र विरोध केला महाराजांच्या या सर्व लोक कल्याणकारी कार्यामुळे खरेखुरे लोककल्याणकारी राजा होते. पददलित व मागासवर्गीयांचे उन्नती हेच छत्रपती शाहू महाराजांनी जीवितकार्य मानले. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही अशी घोषणा त्यांनी केली. उदार विचारप्रणालीचा राजा होते. राज्य सोडावे लागले तरी बेहत्तर पण मागासलेल्या प्रजेच्या सेवेचे व्रत सोडणार नाही, असे शाहू महाराजांनी ठासून सांगितले. कामगारांनो संघटित व्हा व आपले हक्क प्राप्त करून घ्या असा संदेश त्यांनी दिला. He was a king.But democratic king असे उद्गार भाई माधवराव बागल यांनी शाहू महाराजांबद्दल काढले. तर थोर समाज सुधारक वि.रा. शिंदे शाहू महाराजा बद्दल म्हणाले की, शाहू राजा नुसता मराठा नव्हता ब्रह्मतोतर ही नव्हता. तो नव्या युगातील सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरुष होता. तो महाराष्ट्राच्या विकासाचा स्वाभाविक तरंग होता.

**- सुनील सोनटक्के,**
**जिल्हा माहिती अधिकारी लातूर**

# कुडूस येथे अपघाताचे सत्र सुरूच; रस्त्याची झाली चाळण

**वाडा/प्रतिनिधी**

भिवंडी- वाडा या रस्त्याची दरवर्षी पावसाळ्यात चाळण झाल्याचे दिसून येते. रस्ता रुंदीकरण झाल्यापासून या महामार्गावरील अपघातात शेकडो जणांचा जीव गेला आहे तर अपघातात कायमचे अपंगत्व आल्याने अनेक कुटुंबावर आर्थिक परिस्थिती मुळे जगणे दुरापास्त झाले आहे. शनिवारी सकाळच्या सुमारास वाड्याहुन भिवंडीच्या दिशेने सिमेंटचे मोठे पाईप घेऊन जाणाऱ्या ट्रकचा अपघात झाला असून सुदैवाने यात जीवितहानी झाली नाही. कुडूस गावाच्या हद्दीत या महामार्गावर मोठ मोठे व दिड ते दोन फूट खोल असे अनेक खड्डे पडल्याने या खड्ड्यांमुळे दररोज अपघात होत आहेत. अश्याच एका खड्ड्यात गाडीचे चाक गेल्याने पाईप बांधलेली दोरी तुटून गाडीतील पाईप रस्त्यावर येऊन पडले. व वाहतूक काही काळ ठप्प झाली. शुक्रवारी देखील एक तरुणी आपली स्कुटी घेऊन खड्ड्यात पडली होती, सुदैवाने मागून येणाऱ्या ट्रक चालकाने वेळीच ट्रक रोखला नाही तर अनर्थ घडला असता. रस्त्यावरील खड्डयांबाबत विचारणा करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रभारी उप-अभियंता अनिल बरसट यांच्याशी संपर्क केला असता तो होऊ शकला नाही. रस्त्याच्या दुरावस्थेला जबाबदार असलेले सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी असेच नागरिकांना भेटणे किंवा संपर्क साधण्यासही टाळाटाळ करत असल्याने नागरिकांमधून संतप्त भावना व्यक्त होत आहेत.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

28 JUNE TO 04 JULY 2021 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 26/06/2021 9:16 PM Page 1



# भाजपा प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकरांचे उत्स्फुर्त स्वागत



**लातूर/प्रतिनिधी**

भाजपच्या प्रदेश सचिवपदी अरविंद पाटील निलंगेकर यांची निवड झाल्यानंतर त्यांचे लातूर जिल्ह्यात प्रथमच आगमन झाले. यानिमित्ताने विविध ठिकाणी अरविंद पाटील निलंगेकर यांचे उत्स्फुर्त स्वागत करून त्यांच्या निवडीबद्दल जल्लोष व्यक्त करण्यात आला. जिल्ह्यातील लोकप्रतिनिधीसह पक्षपदाधिकार्यांनी त्यांना शुभेच्छा देऊन त्यांचा सत्कार केला. या निमित्ताने पक्षश्रेष्ठींनी आपल्याला जी जबाबदारी दिली आहे ती सार्थ ठरविण्यासाठी आपण सर्वजण एकदिलाने कार्य करून भाजपचे संघटन अधिक मजबुत करू असा विश्र्वास अरविंद पाटील निलंगेकर यांनी व्यक्त केला. अरविंद पाटील निलंगेकरांची प्रदेश सचिवपदी नियुक्ती झाल्याने जिल्हा भाजपात नवचैतन्य पहाण्यास मिळाले. निवडणूका असो या कोणताही कार्यक्रम अरविंद पाटील निलंगेकर यांचे नियोजन म्हणजे शंभर टक्के यश हे सुत्र ठरलेले आहे. अरविंद पाटील निलंगेकर यांच्या या नियोजन कौशल्याची दखल घेत भाजपाच्या पक्षश्रेष्ठींनी त्यांची प्रदेश सचिवपदी नियुक्ती केली आहे. सदर नियुक्ती करताना निलंगेकर यांच्याकडे महाराष्ट्रातील शक्तीकेंद्र व बुथ प्रमुख यांची जबाबदारी देण्यात आली आहे.

प्रदेश सचिवपदी निवड झाल्यानंतर अरविंद पाटील निलंगेकर यांचे लातूर जिल्ह्यात प्रथमच आगमन झाले. यानिमित्ताने जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या आशिव येथे अरविंद पाटील निलंगेकर यांचे आशिव ग्रामपंचायतीसह जिल्हा परिषदेच्या वतीने स्वागत करून त्यांचा सत्कार करण्यात आला. आशिवचे सरपंच गोविंद मदने, उपसरपंच रमेश वळके पाटील, मातोळचे सरपंच बालाजी सुर्यवंशी, डि.के. माने, मोहन आंबेकर, पप्पू घोडके, समाधान काकडे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य व परिसरातील नागरीकांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे, उपाध्यक्षा सौ. भारतबाई साळूंके, सभापती गोविंद चिलकुरे, रोहिदास वाघमारे, जिल्हा संघटन सरचिटणीस संजय दोरवे, चेअरमन दगडू साळूंके यांनी सत्कार केला. याप्रसंगी निलंगा पंचायत समिती सभापती राधा बिराजदार, ॲड. संभाजीराव पाटील, निलंग्याचे उपनगराध्यक्ष मनोज कोळ्ळे, शरद पेठकर, शहराध्यक्ष ॲड. विरभद्र स्वामी, भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ॲड. ज्ञानेश्र्वर चेवले आदींसह निलंगा मतदार संघातील लोकप्रतिनिधी, पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थिती होती. औसा येथे आगमन झाल्यानंतर अरविंद पाटील निलंगेकर यांचे फटाक्याच्या आतिषबाजीने व ढोल ताशाच्या गजरात स्वागत करण्यात आले. यावेळी गणेश कोळपाक, नगरसेवक समिर डेंग, गोपाळ धानुरे, सुर्यकांत शिंदे आदींसह लोकप्रतिनिधी व पक्षपदाधिकारी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. लातूर शहरात आगमन होताच रिंगरोड येथे शहर भाजपाचे उपाध्यक्ष तथा बंजारा क्रांती दलचे अध्यक्ष सुरेश राठोड व त्यांच्या परिवाराने भव्य स्वागत केले. राजीव गांधी चौक येथे भाजपा ओबीसी आघाडीचे जिल्हाध्यक्ष बापू राठोड यांच्यासह जि.प. सदस्य, पदाधिकारी यांनी सत्कार करून स्वागत केले.

बसवेश्वर चौक येथे आगमन झाल्यानंतर अरविंद पाटील निलंगेकर यांनी महात्मा बसवेश्वर महाराजाच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत ध्वाजारोहन केले. यावेळी भाजयुमोचे शहरजिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक अजित पाटील कव्हेकर, प्रदेश भाजपाच्या प्रेरणा होणराव, ॲड. जयश्री पाटील, मंडल अध्यक्ष ज्योतीराम चिवडे, संजय गिर आदींची उपस्थिती होती. लातूरचे ग्रामदैवत सिद्धेश्र्वर रत्नेश्र्वराचे दर्शन घेऊन अरविंद पाटील निलंगेकर यांनी महाआरती केली. त्यानंतर गोलाई येथील जगदंबा देवीचे दर्शन घेऊन येथेही आरती करण्यात आली. यावेळी मनपा गटनेते ॲड. शैलेश गोजमगुंडे, शहर भाजपाचे संघटन सरचिटणीस मनिष बंडेवार, सरचिटणीस शिरीष कुलकर्णी, प्रविण सावंत, प्रदेश भाजपाच्या स्वाती जाधव, शहर महिला अध्यक्षा मिना भोसले, नगरसेवक व्यंकट वाघमारे, शैलेश स्वामी, संगीत रंदाळे, सभापती मंगेश बिराजदार, नगरसेविका दिपा गिते, शितल मालु, रागिनी यादव, श्र्वेता लोंढे, शोभा पाटील, स्वाती घोरपडे आदींसह नगरसेवक, पक्ष पदाधिकारी, कार्यकर्ते यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अरविंद पाटील निलंगेकर यांनी अभिवादन केल्यानंतर निवासस्थांनी त्यांचे मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले. निवासस्थांनी भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेश कराड यांनी अरविंद पाटील निलंगेकर यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी किरण उटगे, भागवत सोट, अजित माने, जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे आदींसह जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, पक्षपदाधिकारी व कार्यकर्ते यांनी अरविंद पाटील निलंगेकर यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी अरविंद पाटील निलंगेकर यांनी पक्षश्रेष्ठींचा विश्र्वास सार्थ ठरवत जिल्ह्यासह राज्यभरात पक्षसंघटन वाढवून पक्षाची विचारधारा समाज घटकापर्यंत पोहचविण्यासाठी एकदिलाने काम करून पुढील काळात भाजपाची विजयी पताका फडकावू असा विश्र्वास व्यक्त केला. अरविंद पाटील निलंगेकर यांच्या निवडीने लातूर जिल्हा व शहर भाजपात नवचैतन्य निर्माण झालेले पाहण्यास मिळाले.

## पेट्रोल-डिझेलवरील दर कमी करुन नागरिकांना दिलासा देण्याची एआयएमआयएमची मागणी




**अहमदपूर/प्रतिनिधी**

पेट्रोल, डिझेल, खाद्यतेल, घरगुती इंधन गॅस यांच्या वाढलेल्या दराच्या निषेधार्थ केंद्र व राज्य सरकारच्या विरोधात एआयएमआयएम पक्षाच्या वतीने तहसीलदार मार्फत मा.केंद्रीय सचिव पेट्रोलियम विभाग गव्हर्मेंट ऑफ इंडिया न्यू दिल्ली व मा.सचिव विक्रीकर विभाग महाराष्ट्र शासन मुंबई यांना निवेदन देण्यात आले. यावेळी पेट्रोल व डिझेलवरील कर कमी करून केंद्र सरकारने नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी पक्षातील सर्व कार्यकर्त्यांनी निवेदना व्दारे केली. पेट्रोल, डिझेलच्या दरामध्ये ४० टक्के मूळ दर तर ६० टक्के कर लावला जातो. म्हणून त्याचे दर वाढतात. केंद्र व राज्य सरकारने आपले कर कमी करून सध्या आकारण्यात येत असलेल्या किमतीमध्ये २५% कपात करावी अशी विनंती एआयएमआयएम पक्षाच्या वतीने निवेदना मार्फत करण्यात आली. अन्यथा लोकशाही मार्गाने तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येईल असा इशाराही देण्यात आला.यावेळी युवा जिलाध्यक्ष जिलानी मनियार,युवा जिल्हा उपाध्यक्ष शेख सत्तार, अतीक पठान, शेख जावेद, शेख शेकूभाई, शेख जमील, शेख खाजा, बागवान मजहर, बागवान महबूब, नन्हु मनियार आदी कार्यकर्त्यांची प्रमुख उपस्थिती होती.

## ग्रीन लातूर वृक्ष टीम द्वारे औसा शहरात वृक्षारोपण



**औसा/प्रतिनिधी**

गत ७५० दिवसांपासून लातूर शहरात सातत्याने अविरतपणे वृक्ष लागवड व वृक्ष संगोपन करत असलेल्या ग्रीन लातूर वृक्ष टीमने लातूर शहराबाहेरील वृक्षप्रेमींना एकत्रित करत आपले कार्यक्षेत्र वाढविण्यास सुरुवात केली आहे. उदगीर तालुक्यातील देवणी-वलांडी येथे २०० झाडे, मुरुड मध्ये १०० झाडे यानंतर औसा शहराच्या मुख्य रस्त्यावर ३०० झाडांचे रोपण करण्यात आले. अखंड अविरतपणे गत ७५० दिवसात वृक्ष लागवड करत ग्रीन लातूर वृक्ष टीमने एकोणसाठ हजार झाडांचे रोपण करण्याचा विक्रम केला आहे. झाडे लावून सातत्याने त्यांचे संगोपन करण्याचे कार्य ग्रीन लातूर वृक्ष टीम करते हे सर्वानी पाहिले आहे. औसा शहरात वृक्ष लागवडीचा उपक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रीन लातूर वृक्ष टीमचे डॉ. पवन लड्डा, मनपा लातूर नगरसेवक इम्रानजी सय्यद, मनमोहन डागा, प्रा. मिनाक्षी बोडगे, राहुल माने, महेश गेलडा, मोईझ मिर्झा, विजयकुमार कठारे, दयाराम सुडे, सूरज साखरे नागसेन कांबळे यांनी परिश्रम घेतले. याबरोबरच औसा शहरातील ॲड समुद्दीन पटेल, शेख शकील, खंडमिर मुल्ला, शहाबद हनमुरे, स्नायूउल्ला शेख, शहानवाज पटेल, जयराज कसबे, मौलाना कलीमुल्ला, जहीमुद्दीन सावकार, आदमखान पठाण, मिसबा पटेल, लाईकुद्दीन पटेल यांनी झाडांचे संगोपन करण्याची जवाबदारी घेतली.

## जिल्हाधिकाऱ्यांनी साधला खेर्डा ग्रामस्थांसोबत संवाद



**परभणी/प्रतिनिधी**

पाथरी तालुक्यातील खेर्डा या गावी जिल्हाधिकारी दीपक मुगळीकर यांनी सायंकाळी चार वाजता भेट दिली. तेथील ग्रामस्थांबरोबर हितगूज केले. त्या गावच्या समस्या, अडीअडचणी ऐकल्या. संबंधितांना कठोर शब्दात सूचना दिल्या. पाठोपाठ त्या गावात मुक्काम करण्याचा निर्णय घेतला. काही दिवसांपूर्वी खेर्डा या गावात हातपंपावरील पाण्यावरुन दोन समाजात वाद उद्भवला होता. हे प्रकरण पोलिस ठाण्यापर्यंत पोहचले होते. त्यानंतर तणाव निवळला. त्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी मुगळीकर यांनी या गावास दुपारी चार वाजता भेट दिली. यावेळी तहसीलदार श्रीकांत निळे, पंचायत समितीचे सभापती सदाशिव थोरात, गटशिक्षणाधिकारी सुहास कारेगावे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी महेश माळवदकर तसेच पोलिस निरीक्षक वसंत चव्हाण, मंडळ अधिकारी शिवाजी भरकड, उपसरपंच विष्णू सिताफळे यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी समावेत होते. यावेळी जिल्हाधिकार्यांनी दोन्ही समाजाच्या ग्रामस्थांबरोबर सुसंवाद साधला. एकोप्याने राहण्याचा, परस्परात सामंजस्य राखण्याच्या सूचना दिल्या. आजपर्यंत सर्व समाज एकमेकांच्या सुख-दुःखात, पाठीशी भक्कमपणे उभे राहीले आहेत. भविष्यातसुध्दा मिळूनमिसळून एकोप्याने राहीले पाहिजे. झालेले प्रकार चुकीचे आहे. संबंधितांना न्यायपालिका योग्य ते शासन करील. पोलिस यंत्रणा कारवाई करीत आहेत. परंतु, ग्रामस्थांनी सामाजिक एकता व शांताता राखली पाहिजे, हीच आपली संस्कृती आहे. ग्रामस्थ ती कायम ठेवतीलच, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी ग्रामस्थांनीही सकारात्मक असा प्रतिसाद, उत्स्फूर्त अशा प्रतिक्रिया नोंदविल्या. पाठोपाठ गावच्या समस्या मांडल्या. विशेषतः पिण्याचे पाणी, रस्ते, वीज, पिककर्ज यासह अडीअडचणी मांडल्या. त्यावेळी जिल्हाधिकारी मुगळीकर यांनी वीज वितरण कंपनीच्या अधिक्षक अभियंत्यांना संपर्क साधून दोन दिवसात वीजेचे पोल उभारुन पुरवठा सुरळीत करावा, असा आदेश दिला. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निश्चितच सोडविला जाईल, असा विश्वास दिला. पीक कर्जासंदर्भात सर्व अर्जांची दखल घेतली जाईल, अशी ग्वाही दिली. तसेच अन्य प्रश्नांबाबतही तपशीलवार चर्चा केली. प्रशासन आपल्या पाठीशी उभे राहील, असा विश्वासही दिला. यावेळी जिल्हाधिकारी मुगळीकर यांनी गावातच मुक्कामी राहण्याचा निर्णय घेतला. व सायंकाळी उशीरापर्यंत ग्रामस्थांबरोबर हितगुज सुरु केले. त्यामुळे ग्रामस्था अक्षरशः भाराहून गेले.

## बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णसेवेसह कोरोना काळात बजावलेल्या कर्तव्यनिष्ठेची नोंद इतिहासात होईल

### राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे गौरवोद्गार



**मुंबई/प्रतिनिधी**

पुण्याच्या बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला रुग्णसेवेची प्रदीर्घ परंपरा आहे. समाजासाठी तज्ज्ञ डॉक्टर घडविणाऱ्या देशभरातील संस्थांमध्ये बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाचा अव्वल क्रमांक लागतो. अमृतमहोत्सवी वाटचालीत केलेल्या रुग्णसेवेबद्दल आणि कोरोना काळात बजावलेल्या कर्तव्यनिष्ठेबद्दल बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयाच्या कार्याची नोंद इतिहासात होईल, असे गौरोवोद्गार उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काढले. पुण्याच्या बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अमृतमहोत्सवानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार ऑनलाईन सहभागी झाले होते. यावेळी वैद्यकीय शिक्षणमंत्री अमित देशमुख (व्हिसीद्वारे), आमदार चेतन तुपे, वैद्यकीय शिक्षण सचिव सौरभ विजय, यशदाचे महासंचालक तथा ससून रुग्णालयाचे समन्वयक एस. चोक्कलिंगम, वैद्यकीय शिक्षण संचालक डॉ. तात्याराव लहाने, बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. मुरलीधर तांबे, सहसंचालक डॉ. अजय चंदनवाले उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, पुण्यात आणि राज्यात रुग्णसेवेचा आदर्श, गौरवशाली परंपरा निर्माण करणाऱ्या ससून रुग्णालयाच्या संलग्न बी. जे. मेडिकल कॉलेजची सुरुवात झाली. या वैद्यकीय महाविद्यालयाने पुण्यातील तसेच राज्यातील जनतेची, रुग्णांची अनेक वर्षे सेवा केली आहे. या वैद्यकीय महाविद्यालयात शिकून अनेक विद्यार्थी तज्ज्ञ डॉक्टर म्हणून रुग्णांची देश-विदेशात सेवा करत आहेत. ससून रुग्णालयात राष्ट्रपिता महात्मा गांधींसह अनेक मान्यवरांनी उपचार घेतले आहेत. गेल्या दिड वर्षापासून सुरु असलेल्या कोरोनाच्या संकटातही अनेकांनी या रुग्णालयामध्ये उपचार घेतले आणि ते बरे झाले. कोरोनाच्या संकटात, ससून रुग्णालय आणि बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय हे आपले प्रमुख आधारस्तंभ बनले आहेत. कोरोना संकटकाळात ससून रुग्णालय आणि बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयाने केलेल्या कामाची आणि दिलेल्या रुग्णसेवेची नोंद इतिहासात होईल. ससून आणि बी.जे. वैद्यकीय महाविद्यालय या शासकीय संस्था आहेत. रुग्णसेवा आणि समाजसेवा या ध्येय्याने या संस्था काम करतात. कोरोनाकाळात अनेक रुग्ण उपचारासाठी पहिल्यांदा खाजगी रुग्णालयात दाखल झाले, मात्र चांगले उपचार मिळावेत, यासाठी ते ससून रुग्णालयात भरती होत होते. कोणत्याही खाजगी हॉस्पिटलपेक्षा चांगली अत्याधुनिक उपचार यंत्रणा आणि रुग्णसेवा ससूनमध्ये मिळते, हा लोकांचा विश्वास आहे. अनेक रुग्ण गंभीर अवस्थेत इथे यायचे, त्यातल्या अनेकांचे प्राण आपण वाचवले आहेत. अत्याधुनिक उपचार यंत्रणा, दर्जेदार रुग्णसेवा, समाजासाठी तज्ज्ञ डॉक्टर निर्माण करण्याचे काम महाविद्यालयाने कायम सुरु ठेवावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख म्हणाले, बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाला गौरवशाली इतिहास आहे. कोरोना संकटातही बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाने आपला गौरवशाली इतिहास कायम ठेवला आहे. बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयासह वैद्यकीय शिक्षण विभागाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार हे कायम तत्पर असतात, कोरोना काळात त्यांनी आपल्या विभागाला निधी कमी पडू दिला नाही, त्याबद्दल देशमुख यांनी उपमुख्यमंत्र्यांचे आभार मानले.

## दोन्ही डोस घेतलेल्यांची संख्या ५० लाखांवर

मुंबई : राज्यातील अडीच कोटींहून अधिक नागरिकांना कोरोना प्रतिबंधक लस देऊन महाराष्ट्राने देशातील अग्रस्थान कायम राखले आहे. विशेष म्हणजे राज्यात दोन्ही डोस घेतलेल्या नागरिकांची संख्या ५० लाखांहून अधिक आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात लसीकरण करणारे महाराष्ट्र एकमेव राज्य असून त्यापाठोपाठ उत्तर प्रदेश आणि गुजरातचा क्रमांक लागतो. राज्याच्या या कामगिरीबद्दल मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी यंत्रणेचे कौतुक केले आहे.

## लग्न करण्याचे आमिष दाखवून विधवा महिलेवर दुष्कर्म

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील नाविंदगी गावातील एका विधवा महिलेला लग्न करण्याचे आमिष दाखवून व जीवे मारण्याची धमकी देऊन एका ३१ वर्षीय विधवा महिलेवर वारंवार दुष्कर्म करण्यात आल्याची घटना घडली आहे. माजी सरपंच निंगप्पा सिद्राम पुजारी व वाहन चालक निलप्पा पुजारी या दोघांविरुद अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित महिला नाविंदगी येथे माहेरी कुटुंबियासह राहण्यास असून तिचे लग्न होऊन ११ वर्ष झाले होते. तर २०१५मध्ये पतीचे निधन झाले. तेव्हापासून ती माहेरी दोन्ही मुलींसह राहण्यास आहे. माजी सरपंच पुजारी हा गेल्या सहा महिन्यांपासून पीडित महिलेच्या संपर्कात आला. त्यातून दोघांमध्ये ओळख निर्माण झाली.

पीडित महिला विधवा असल्याने पुजारी याने तिच्याशी लग्न करण्याची तयारी दर्शविली होते. ११ रोजी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास पीडित महिला शेताला जात असताना आरोपीने तिला कार मधून नेले. सोलापूर येथे नेऊन एका कागदावर तिच्याकडून लिहून घेतले व त्यानंतर अक्कलकोट मध्ये एका खोलीत डांबून ठेवून निंगप्पा पुजारी याने कुटुंबाला ठार मारण्याची धमकी देऊन वेळोवेळी दुष्कर्म केले आहे. त्यानंतर तिला मोटारसायकल वरून वळसंग येथील बसस्थानकाजवळ सोडले असे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक तुकाराम राठोड करीत आहेत.

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पालघर**

**ई-निविदा सूचना क्रमांक - ०४ सन २०२१-२०२२**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पालघर शासकीय विश्रामगृह आवार, जुना मनोर रस्ता, वेवुर रोड, पालघर हे ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ब-१ नमुन्यातील निविदा महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत **सुशिक्षित बेरोजगार अभियंता** ठेकेदाराकडून मागवित आहेत.

टिप : सदर निविदा सूचनेमध्ये एकूण ०१ (एक) काम समाविष्ट आहेत. या निविदेवरील संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावरून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

1) www.mahapwd.com 2) http://mahatenders.gov.in

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रुपये लक्ष जी.एस.टी.वगळून | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| १. | ग्रुप ग्रामपंचायत कोलवली देदाळे मधील कोटीम गावांतर्गत मेन स्टॉप ते श्री प्रमोद चव्हाण यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. ता. डहाणू, जि. पालघर | ११,९२,८२६/- | खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम सन २०२१-२२ (मा. खा. श्री. राजेंद्र गावीत) |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

ई-निविदा उपलब्ध कालावधी - दि. २८/०६/२०२१ ते दि. १२/०७/२०२१ पर्यंत

ई-निविदा उघडणे - दि. १६/०७/२०२१ दुपारी ३.०० नंतर शक्य झाल्यास.

<u>स्थळप्रस्त का.अ.यांनी मंजूर केली आहे.</u>

जा.क्र. सा.बां.वि./पालघर/निविदा/२८५५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सा.बां. विभाग, पालघर
शासकीय विश्रामगृह आवार,
जुना मनोर रस्ता, वेवुर रोड,
पालघर (पुर्व) - ४०१ ४०४.
दिनांक : २३/०६/२०२१

सही/-
कार्यकारी अभियंता,
सा.बां. विभाग, पालघर
*करिता*

**जिमाका/पालघर/जाहि१०/२९९/२०२१ दिनांक : २३/०६/२०२१**

28 JUNE TO 04 JULY 2021 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 26/06/2021 9:17 PM Page 1



# भिवंडीत ओबीसी आरक्षणासाठी भाजपचे चक्का जाम आंदोलन



**भिवंडी/आकाश गायकवाड**

ओबीसींच्या राजकीय आरक्षणाचा मुद्दा तापलेला असताना आता भाजपकडून रस्त्यावर उतरुन आंदोलन करण्यात आले. शनिवार सकाळी भाजपाच्या वतीने खासदार कपिल पाटील यांच्या नेतृत्वाखाली रांजणोली नाका येथील मुंबई-नाशिक महामार्गावर चक्का जाम आंदोलन करण्यात आले. राज्यातील शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या महाविकास आघाडी सरकारच्या नाकर्तेपणापुळे ओबीसी समाजाचे राजकीय आरक्षण सर्वोच्च न्यायालयाने रद्द केले आहे. त्यामुळे राज्यातील ओबीसी समाजाचे मोठे राजकिय नुकसान होणार आहे. तसेच भविष्यात राजकिय आरक्षणा प्रमाणे शैक्षणिक आणि नोकरी मधील आरक्षण देखील रद्द होण्याची शक्यता आहे असंही भाजपने म्हटलं आहे.भाजपाच्या आंदोलन कर्त्यांनी महामार्गावर चक्काजाम करत आघाडी सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. ५२ टक्के ओबीसी समाज आहे.त्यानुसार सर्व क्षेत्रात ओबीसी समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे. ओबीसी समाजाची जनगणना झाली पाहिजे. आरक्षण आमच्या हक्काचे नाही कोणाच्या बापाचे

ओबीसी समाजाला आरक्षण मिळणार नाही तो पर्यत गप्प बसणार नाही. आरक्षण मिळणार नाही तो पर्यत संघर्ष करणारच. असे ठणकावून सांगत आंदोलन केले यावेळी भाजपा युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष देवेश पाटील,ओबीसी एकता समता परिषदेचे अध्यक्ष प्रा. विनोद हनुमान पाटील, भाजपा व्यापारी आघाडीचे अध्यक्ष यशवंत सोरे, आदिवासी सेलचे अध्यक्ष महादेव घाटाळ,उद्योग आघाडीचे अध्यक्ष विनोद ठाकरे, प्रदेश ओबीसी मोर्चा कार्यकारी सदस्य बाळाराम कराळे, टी आर पाटील, रामदास भोईर, सुरेंद्र भोईर, भानुदास पाटील, राम भोईर, राम माळी, तुकाराम चौधरी, गोपीनाथ चौधरी, गिरीश म्हात्रे, विष्णू भोईर, रामनाथ पाटील, छत्रपती पाटील, जितेंद्र डाकी, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष श्रीधर पाटील, मा.जिल्हाध्यक्ष श्रीकांत गायकर,तालुकाध्यक्ष निलेश गुरव, युवा मोर्चा ओबीसी मोर्चा तालुकाध्यक्ष गुरुनाथ जाधव, भाजपा विधानसभा क्षेत्र अध्यक्ष प्रमोद पाटील,तुकाराम बजागे, रवि जाधव, योगेश भोईर, विलास भोईर, संदीप चौधरी, पंकज तरे आदी भाजपाचे कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान भिवंडी शहरातील कल्याण नाका इथंही चक्काजाम आंदोलन करण्यात आले आहे. भिवंडीचे खासदार कपिल पाटील, आमदार महेश चौघुले यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा भिवंडी शहर जिल्हा अध्यक्ष संतोष शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली व ओबीसी मोर्चा अध्यक्ष महेंद्र अरुण जाधव यांच्या अध्यक्षतेखाली आंदोलन कर्त्यांनी सरकार विरोधात शहरातील साकरा देवी मंदिर कल्याण नाका येथे चक्का जाम करीत रस्त्यावर बसून आंदोलन करण्यात आले. यावेळी सांगटन महासचिव व नगरसेवक हर्षल पाटील, गटनेता हनुमान चौधरी,




महासचिव राजू गाजेंगी, प्रेमनारायण राय, नगरसेवक श्याम अग्रवाल, नित्यानंद नाडर, महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चा सदस्य निर्मला टावरे, जिल्हा उपाध्यक्ष संदीप पाटील, सत्वशीला जाधव, युवा अध्यक्ष राजू चौघुले, महिला मोर्चा अध्यक्ष ममता परमनी, उत्तर भारतीय अध्यक्ष प्रवीण मिश्रा, दक्षिण भारतीय अध्यक्ष मोहन कोंडा, बिहार प्रकोष्ठ अध्यक्ष दीपक झा, सांस्कृतिक सेल संयोजिका मानसी राजे, सोशल मीडिया प्रमुख राम बुरा, मंडळ अध्यक्ष भरत भाटी आदी मोठ्या संख्येने कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

# वाड्यातील अंगणवाडी सेविकेचा मारेकरी अखेर पोलिसांच्या ताब्यात



**वाडा/वार्ताहर**



वाडा तालुक्यातील सापणे (खुर्द) येथील रहिवासी असलेल्या महिलेचा तिच्या घरात रात्रीच्या सुमारास घुसून तीक्ष्ण हत्याराने वार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली होती. दरम्यान अनेक संघटना व राजकीय पक्षाच्या वतीने या प्रकरणाचा निषेध करून आरोपीस अटक करण्याची मागणी केली होती. शुक्रवार दि. ११जून २०२१ रोजी पहाटेच्या सुमारास मयत सुप्रिया गुरुनाथ काळे (वय ४५) ही आपल्या राहत्या घराचे हॉलमध्ये झोपली असतांना अज्ञात इसमांनी किचनच्या स्लाईडगीच्या खिडकी वाटे आत प्रवेश करून मयत हिच्या कानाच्या खाली धारदार हत्याराने वार करुन जिवे ठार मारुन तीचे कानातील सोन्याची कर्ण फुले, मंगळ सुत्र व एक मोबाईल असा एकुण ६२ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेला म्हणून वाडा पोलीस ठाण्यात चोरी व खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचे गाभीर्य लक्षात घेवुन दत्तात्रय शिंदे , पोलीस अधीक्षक, पालघर व प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, प्रशांत परदेशी, उपविभागिय पोलीस अधिकारी जव्हार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि आसीफ बेग, वाडा पोलीस ठाणे व पोउनि आशिष पाटील, स्थानिक गुन्हे शाखा बोइसर यांची वेगवेगळी तपास पथके तयार करुन, सदर पथकास तपासकामी सुचना व मार्गदर्शन करुन तपास पथके वेगवेगळ्या परिसरात रवाना केलेली होती. सदर प्रकरणी कोणत्याही प्रकारचे धागेदोरे नसतांना कौशल्यपुर्ण गुन्ह्याचा तपास करुन पोउनि आशिष पाटील, स्थानिक गुन्हे शाखा , बोईसर व त्यांचे पथकाने सदर गुन्ह्यात एक आरोपीत वय ३५ वर्षे रा.कर्जुन, ता.वसई यास अटक करुन त्याची कसुन चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली असल्याची माहिती पोलीस निरीक्षक सुधीर संखे यांनी दिली आहे.

पान १ वरून....

## ठसन देवून डिवचल्याने घात झाला...

राहतात. सहा महिन्यापुर्वी त्यांच्या नातीचा वाढदिवस होता. भोला इंगळे यांनी नातीचा वाढदिवस चांगल्या प्रकारे साजरा केला होता. नातीच्या वाढदिवसानिमीत्त त्यांनी परिसरातील लोकांना आपल्याकडे बोलावले होते. त्या कार्यक्रमाला सचिन देखील गेला होता. वाढदिवसाच्या कार्यक्रमात गाण्याच्या तालावर सचिनला नाचण्याचा मोह झाला. गाण्याच्या तालावर नाचण्याच्या मोहाला तो आवर घालू शकला नाही. त्याचे असे सार्वजनीक नाचण्याचे वर्तन गल्लीतील रहिवासी असलेल्या अजय रविंद्र तायडे, राहुल गजानन कदम व अक्षय संजय भैसे यांना आवडले नाही. त्यांनी त्याला नाचण्यापासून रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र सचिनच्या अंगात नाचण्याची जरा जास्तच हौस आली होती. त्यामुळे तिघांनी त्याला पुन्हा पुन्हा समजावण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे तिघांसोबत सचिनचा कमी अधिक प्रमाणात वाद निर्माण झाला. सचिन जणू काही तिघा जणांना डिवचत होता. शब्दामागे शब्द वाढत असतांना तिघांनी मिळून सचिनला मारहाण करण्यास सुरुवात केली. हा वाद एवढा वाढला की अजय, राहुल व अक्षय या तिघा तरुणांनी मिळून सचिनला जवळच असलेल्या भोगावती नदीच्या पात्रात ढकलून दिले. प्रकरण वाढत असल्याचे बघून सचिनचा भाऊ भिमराज तेथे धावत आला. भिमराजने तिघा तरुणांची विनवणी करत भाऊ सचिन यास सोडून देण्यास सांगितले. भिमराज मगरे याची विनवणी बघून तिघा जणांनी सचिनला मारहाण करण्याकामी लगाम लावला. भिमराजच्या विनवणीमुळे सचिनची त्या दिवशी कशीबशी सुटका झाली. आता झाले गेले विसरुन या तिघांच्या नादी न लागणे यात सचिनचा शहानपणा होता. मात्र तसे झाले नाही. एवढ्या मोठ्या प्रमाणात मार बसल्यानंतर देखील सचिनची फळफळ थांबण्यास तयार नव्हती. तिघे जण समोर आले म्हणजे तो त्यांच्याकडे खुनशी नजरेने बघत होता. तो एकप्रकारे तिघांना डिवचत होता. त्यामुळे अजय, राहुल व अक्षय या तिघांच्या अहंभावाला जणू काही आव्हान दिले जात होते. सचिन मगरे याला जास्त माज आला असल्याची भावना तिघा तरुणांच्या मनात घर करुन बसली होती. रस्त्याने जाता येता तो तिघांकडे बघून त्यांना डिवचण्याचे काम काही थांबवत नव्हता. त्यामुळे साहजीकच तरुणाईचा जोश अंगी असलेल्या तिघांचा राग उफाळून येण्यास वेळ लागत नव्हता. सचिन मगरे हा देखील एकदम विशीतील तरुण होता. त्यामुळे त्याच्या अंगी देखील जोश आणि उत्साह ओसंडून वहात होता. कुणीच कुणाचे ऐकून घेण्याच्या व समजून घेण्याच्या तयारीत नव्हता. प्रत्येक जण आपली तारुण्याची रग दाखवण्याचा प्रयत्न करण्यात मशगुल होता. सचिनचा भाऊ भिमराज मात्र तिघांच्या हातापाया पडून आपल्या भावाला समजून घ्या, त्याच्याकडे लक्ष देऊ नका असे म्हणून वेळोवेळी विनवणी करत होता. ७ जून रोजी साधारण सकाळी दहा वाजेच्या सुमारास बस स्थानक परिसरात सचिन व तिघा तरुणांची नजरानजर झाली. त्यावेळी सचिनने तिघांकडे बघून त्यांना नेहमीप्रमाणे डिवचले. आज सचिनचा गेम करुनच टाकू असे तिघांनी आपसात त्याचवेळी ठरवले. सर्वांच्याच अंगी तारुण्याचा जोश आणि हुल्लडबाजी होती. तिघांना माहिती होते की सचिन रोज सायंकाळी जिमला जातो. जिममधून घरी जातांना वाटेत दुध घेण्यासाठी थांबतो. दुकानावरुन दुध घेतल्यानंतर तो घरी जातो. हा त्याचा नित्यक्रम तिघांना माहिती होता. ७ जूनच्या रात्री तो जिममधून बाहेर आला. वाटेत नेहमीप्रमाणे त्याने दुध घेतले. त्यानंतर तिघांसोबत असलेल्या एका अल्पवयीन मुलाने देखील त्याला हेरले. आज ते एकुण चार जण होते. रात्रीचे दहा वाजून गेले होते. रात्रीच्या अंधारातच चौघांनी त्याला रिंगणात घेतले. त्याचवेळी सचिनचा भाऊ भिमराज हा रात्रीचे जेवण आटोपून आंबेडकर पुतळ्याजवळ गॅरेजच्या बाजूला सहज बसला होता. त्यावेळी त्याला सचिनची मोटारसायकल पुतळ्याजवळ दिसली. काही वेळाने त्याला सचिनचा जिवाच्या आकांताने होणारा आक्रोश ऐकू आला. आवाजाच्या दिशेने सचिनचा भाऊ भिमराज धावला. महालक्ष्मी सॉ मील जवळ राहुल गजानन कदम, अजय रविंद्र तायडे, अक्षय संजय भैसे व त्यांच्यासोबत असलेला अल्पवयीन मुलगा असे सर्वजण सचिन मगरे यास शिवीगाळ करुन लाथाबक्क्यानी मारहाण करत होते. त्यावेळी अजय रविंद्र तायडे याने त्याच्याजवळ असलेल्या धारदार शस्त्राने सचिनच्या पाठीवर, मानेवर वार केले. धारदार शस्त्राच्या घावात सचिन रक्तबंबाळ होत मोठ्या प्रमाणात जखमी झाला. रक्ताच्या थारोळ्यात सचिन जागेवरच कोसळला. सचिनच्या छातीवर, तोंडावर, पाठीवर व मानेवर एकुण नऊ ठिकाणी वार झाल्यामुळे जागेवर मोठ्या प्रमाणात जणू काही रक्ताचा सडा पडला होता. आपल्या भावाला वाचवण्यासाठी भिमराज याने चौघांची विनवणी सुरु केली. काहीही करुन सचिनला सोडा अशी आर्त विनवणी तो करत होता. काही वेळाने चौघे मारेकरी प्रतिभा नगरच्या दिशेने पळून गेले. दरम्यान भिमराजच्या शेजारी राहणारा संतोष इंगळे तेथे धावत आला. त्याच्या मदतीने सचिन यास दवाखान्यात नेण्यात आले. डॉक्टरांनी सचिन यास मयत घोषित केले. सचिन मयत झाल्याचे समजताच भिमराज धाय मोकलून रडू लागला. या घटनेची माहिती मिळताच वरणगाव पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरिक्षक संदिपकुमार बोरसे व त्यांचे सहकारी घटनास्थळी व दवाखान्यात हजर झाले. घटनेची माहिती समजून घेत स.पो.नि. संदिपकुमार बोरसे यांनी तात्काळ मारेकऱ्यांच्या शोधार्थ पथक रवाना केले होते. याप्रकरणी ८ जूनच्या पहाटे चार वाजेच्या सुमारास भिमराज मगरे याच्या फिर्यादीनुसार वरणगाव पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा भाग ५ गु.र.न. ११५/२१ भा.द.वि. ३०२, ३२३, ५०४, २५(४), ३४ नुसार अजय रविंद्र तायडे, राहुल गजानन कदम, अक्षय संजय भैसे व त्यांच्यासोबत असलेल्या अल्पवयीन मुलाविरुद्ध दाखल करण्यात आला. स.पो.नि. संदिपकुमार बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली चौघा हल्लेखोरांना सकाळपर्यंत ताब्यात घेत अटक करण्यात आली. मंगळवार ८ जून रोजी त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने सुरुवातीला त्यांना चार दिवस पोलिस कोठडी सुनावली. या घटनेनंतर अटकेतील तरुणांच्या मनावर जणूकाही निर्ढावल्यासारखे हावभाव दिसून येत होते. या घटनेचा तपास स.पो.नि. संदिपकुमार बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

## चोरीच्या मालास लागल्या संशयाच्या ...

करण्याचे ठरवले. ट्रक खरेदीसाठी काही रक्कम कमी पडत होती. त्यामुळे त्याने बँकेतून कर्ज काढून रकमेची तरतूद करत दोन ट्रक खरेदी केल्या. दोन ट्रक खरेदीच्या व्यवहारात त्याच्याकडील पैसे संपले होते. शिवाय बँकेचे हप्ते देखील सुरु झाले होते. दोन ट्रकचा मालक नारायण घागरे हा अद्याप भाड्याच्या घरातच रहात होता. त्यामुळे स्वत:च्या घरात जाण्याचे देखील त्याचे स्वप्न होते. या स्वप्नपुर्तीसाठी तो प्रयत्नशील होता. हळूहळू तो ट्रकद्वारे मालवाहतूकीच्या व्यवसायात रुळला. छिंदवाडा येथीलच रहिवासी असलेले प्रकाश साहू आणि नंदकिशोर उईके हे दोघे जण त्याच्या ट्रकवर चालकाचे काम करत होते. दोघा चालकांच्या बळावर नारायण घागरे याचा मालवाहतूकीचा व्यवसाय व्यवस्थित सुरु होता. मात्र कालांतराने देशात सर्वत्र लॉकडाऊन सुरु झाले. जेमतेम रुळावर आलेली अनेकांची व्यवसायाची गाडी लॉकडाऊन कालावधीत बिघडली. त्याला नारायण घागरे हा देखील अपवाद नव्हता. लॉकडाऊन संपल्यानंतर पुन्हा व्यवसायाची गाडी रुळावरुन धावण्यास सुरुवात झाली. ट्रकच्या कर्जाचे हप्ते सुरु झाले होते. तरीदेखील भाड्याच्या घरातून स्वत:च्या घरात जाण्याचा नारायणचा मोह काही केल्या सुटत नव्हता. त्यासाठी काहीही करुन झटपट श्रीमंतीचा मार्ग पत्करण्याची त्याने मनाशी तयारी चालवली होती. त्याच्या मनात विविध कुविचार येण्यास सुरुवात झाली होती. मोह हे दुखा:चे कारण असते. अती मोह मनुष्याला विनाशाच्या दिशेने घेऊन जात असतो. याची जाणीव मनुष्याला वेळीच होणे गरजेचे असते. मात्र कित्येक जण मोहाच्या पाशात गुरफटत जातात. त्यांना मोहाच्या व्यतिरिक्त दुसरे जग दिसतच नाही. अशीच काहीशी अवस्था नारायण घागरे याची झाली होती. झटपट पैसे मिळवण्यासाठी त्याने आपल्याच दोघा चालकांची मदत घेण्याचे ठरवले. अकोला येथे माल घेऊन गेलेल्या ट्रकला परतीच्या प्रवासात नागपूरसाठी सोयाबिन वाहतूकीचे भाडे मिळते हे नारायण याच्यासह त्याच्या दोन्ही चालकांना चांगल्या प्रकारे माहित होते. अकोला येथे ट्रकने माल वाहतूकीचा योग आला तर परस्पर सोयाबीन चोरी करुन परस्पर विक्री केल्यास आपल्याला मोठी रक्कम मिळू शकते असा कुविचार त्याच्या मनात चमकून गेला. अकोला येथे ट्रिप लागण्याची गेल्या दिड महिन्यापासून तो आतुरतेने वाट बघत होता. अखेर त्याला अकोला येथील मालवाहतुकीची ट्रिप लागली. त्यामुळे ट्रकमालक नारायण घागरे, चालक प्रकाश साहू व नंदकिशोर उईके या तिघांनी सोयाबिन परस्पर विक्रीचा आणि ते सोयाबीन चोरी झाल्याचे सांगायचे, असा कट रचला. ४ जून रोजी छिंदवाडा येथून दोघा चालकांनी ट्रकमधे वालपुट्टी भरली. दोन्ही ट्रकमधे भरलेली वालपुट्टी त्यांना अकोला येथे रिकामी करुन द्यायची होती. अकोला येथे वालपुट्टीने भरलेला ट्रक रिकामा झाल्यानंतर मिळेल त्या भावात सोयाबीनची ट्रिप नागपुरसाठी घ्यायची होती. ठरल्यानुसार दोघे चालक वालपुट्टीने भरलेले ट्रक घेऊन अकोलाच्या दिशेने रवाना झाले. वालपुट्टी अकोला येथे रिकामी केल्यानंतर दोघांनी २५० क्विंटल सोयबीन ट्रकमधे भरली. हे सोयाबीन त्यांना नागपुरनजीक बुटीबोरी येथील एका कारखान्यात नेवून द्यायचे होते. मात्र त्यांनी पुर्वनियोजनानुसार सोयाबीनची डिलीव्हरी केलीच नाही. सोयाबीनने भरलेले ट्रक प्रकाश व नंदकिशोर या दोघांनी संगनमताने नांदगाव पेठ आणि वरुडमार्गे छिंदवाडा येथे नेले. हा चोरीचा पुर्वनियोजित कट असल्यामुळे नंदकिशोर याने अगोदरच छिंदवाडा येथील एका व्यापा-याशी खरेदी विक्रीचा व्यवहार सुरु केला होता. मात्र हा चोरीचा माल असल्याचे लक्षात आल्यामुळे तो व्यापारी मनातून घाबरला. त्याने ऐनवेळी तो २५० क्विंटल सोयाबीनचा माल घेण्यास नकार दिला. आता काय करावे हे दोघा चालकांना सुचेना. प्रकरण अंगाशी येऊ शकते असे लक्षात आल्यामुळे ट्रकमालक नारायण घागरे याने ते सोयाबीन नियोजीत नागपुर - बुटीबोरी येथील कारखान्यावर पोहोचवून देण्यास दोघा चालकांना सांगितले. मात्र दुसरा चालक प्रकाश साहू याने दुस-या व्यापा-यासोबत सोयाबीन विक्रीचा व्यवहार करण्यास सुरुवात केली. साडे अठरा लाखाचे सोयाबीन बारा लाखात छिंदवाडा येथील एका व्यापा-याला विकण्यात आले. ५ जून रोजी दोन्ही ट्रक रिकामे करण्यात आले. हातात लाखो रुपयांची रक्कम आल्यानंतर ट्रकमालक नारायण घागरे, चालक प्रकाश साहू व नंदकिशोर उईके असे तिघे जण मध्यप्रदेशातच एका जागी बसले. तिघांनी तेथे यथेच्छ मद्यपान करत भोजन केले. मद्यपान करत असतांना ट्रकमालक नारायण घागरे व प्रकाश साहू यांना नंदकिशोर याच्यावर संशय येऊ लागला. त्याचे कारण म्हणजे नंदकिशोर उईके हा अति प्रमाणात मद्य सेवन करणारा होता. मद्याच्या नशेत गोपनीय गोष्टी सार्वजनीक ठिकाणी कथन करण्याची त्याल सवय होती. त्यामुळे हा सोयाबीन चोरीचा व विक्रीचा प्रताप तो मद्याच्या नशेत कुठेही बरळू शकतो अशी शंका दोघांना आली. त्यामुळे नंदकिशोर उईके याला या जगातून कायमचे घालवण्याचा दोघांनी विचार केला. आपले बिंग नंदकिशोरच्या माध्यमातून केव्हाही बाहेर येऊ शकते ही चिंता दोघांना सतावत होती. त्यामुळे प्रकाश साहू व नारायण घागरे या दोघांनी मिळून मध्यप्रदेशातील जामसावलीच्या जवळपास नंदकिशोरचा दोरीने गळा आवळून खून केला. प्रकाशने त्याचा मृतदेह तेथून जवळपास ११० किलोमिटर अंतरावर मोर्शी मार्गावर ट्रकने आणून रस्त्याच्या कडेला फेकला. दरम्यान ट्रकमालक नारायण घागरे हा कारने ट्रकच्या मागेमागेच होता. मयत नंदकिशोरचा चेहरा कुणाला समजू नये म्हणून दगडाने ठेचून विद्रुप करण्यात आला. मृतदेह रस्त्याच्या कडेला फेकून दिल्यानंतर प्रकाश साहू याने तो ट्रक नांदगाव पेठनजीक मुद्दाम बेवारस सोडून दिला. या घटनाक्रमानंतर प्रकाश साहू व ट्रकमालक घागरे हे दोघे जण कारने छिंदवाड्याला परत गेले.

त्यानंतर ८ जून रोजी सकाळी शिरखेडच्या हद्दीत नंदकिशोर उईके याचा मृतदेह परिसरातील लोकांना आढळून आला. या घटनेची माहिती शिरखेड पोलिसांना कळवण्यात आली. माहिती मिळताच शिरखेड पोलिस स्टेशनचे पोलिस पथक घटनास्थळी हजर झाले. पोलिसांसह सर्वांच्याच दृष्टीने नंदकिशोरचा मृतदेह अनोळखी होता. मयताच्या हातावर नंदकिशोर असे गोंदलेले होते. त्याची हत्या झाल्याचे दिसून येत होते. याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध शिरखेड पोलिस स्टेशनला खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा भाग ५ गु.र.न. १७२/२१ भा.द.वि. ३०२, २०१ नुसार दाखल करण्यत आला. दरम्यान शिरखेड पोलिसांनी शोधपत्रिकेच्या माध्यमातून मयताचा फोटो प्रसिद्ध करुन ओळख पटवण्याचा प्रयत्न केला. आपल्या ट्रकचालकाचा कुठेही थांगपत्ता लागत नसल्याचे भासवत ट्रकचालक नारायण घागरे हा नांदगाव पेठ पोलिस स्टेशनला स्वत:हून हजर झाला. आल्यावर त्याने पोलिसांना सांगितले की माझ्या मालकीचा ट्रक हा नांदगाव पेठजवळ उभा आहे. मात्र त्यावरील चालक नंदकिशोर सकुल उईके हा गायब आहे. चर्चेअंती शिरखेड पोलिसांनी प्रसिद्ध केलेली शोधपत्रीका व त्यावरील मयताचा फोटो त्याला दाखवला. त्यावर हा आपलाच बेपत्ता चालक नंदकिशोर असल्याचे त्याने पोलिसांना सांगितले. मयत हा ट्रकचालक असून त्याचे नाव नंदकिशोर सकुल उईके (रा. छिंदवाडा - मध्यप्रदेश) असल्याचे पोलिसांसाठी निष्पन्न झाले. अमरावती ग्रामीण पोलिस अधिक्षक हरी बालाजी एन यांच्या मार्गदर्शनाखाली या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. तपन कोल्हे यांच्याकडे देण्यात आला. पो.नि. तपन कोल्हे यांनी या गुन्ह्याच्या तपासकामी आपली तपासचक्रे वेगाने फिरवण्यास सुरुवात केली. पोलिसांना माहिती देणारा ट्रकचालक किती प्रमाणात खरे व किती प्रमाणात खोटे बोलत आहे याची सत्यता पडताळून पाहण्यास त्यांनी सुरुवात केली. तपासादरम्यान परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. अकोला मार्गावरील एका पेट्रोलपंपावर असलेल्या सीसीटीव्हीच्या फुटेज तपासले असता मयत नंदकिशोरसोबत अजून एक जण होता. त्यामुळे पोलिस पथकाचा नारायण घागरेवरील संशय बळावला. त्याची कसून चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल केला. दरम्यान दुसरे पथक १२ जून रोजी छिंदवाडा येथे जावून धडकले. तेथे त्यांच्या हाती प्रकाश साहू लागला. प्रकाश साहू यास चौकशीकामी ताब्यात घेण्यात आले. त्याला पोलिसी खाक्या दाखवल्यानंतर त्याने देखील सत्य उलगडले. दोघांनी कबुल केल्याप्रमाणे छिंदवाडा येथून चोरीचे विक्री केलेले सोयाबीन जप्त करण्यात आले. अशा प्रकारे अमरावती ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.तपन कोल्हे यांच्यासह स.पो.नि. गोपाल उपाध्याय, पो.उ.नि. विजय गराड, सुरज सुसतकर, आशिष चौधरी यांनी कठोर परिश्रम घेत हा गुन्हा उघडकीस आणला. घर बांधण्यासाठी रक्कम हवी असल्यामुळे ट्रक मालक नारायण घागरे याने आपल्या चालकांच्या मदतीने सोयाबीनचा माल परस्पर विकून लाखो रुपये मिळवले. बिंग उघडकीस येऊ नये म्हणून चालक नंदकिशोर उईके याचा खून केला. मात्र एवढे करुन नारायण घागरे याच्या हाती काहीच आले नाही. त्याचा एक चालक त्याच्यासोबतच जेलमधे गेला. त्याला भाड्याच्या घरातून जेलमधे जाण्याची वेळ आली. त्याच्या ट्रकच्या कर्जाचे हप्ते सुरुच राहिले. झटपट श्रीमंत होण्यासह नविन घर बांधण्याचे स्वप्न नारायण पुर्ण करु शकला नाही.

## रिक्षावालीला रंगेल रिक्षावाला भेटला...

पतीची हत्या केली. ऐवढेच नव्हे तर तिने पतीच्या मृतदेहाची परस्पर विल्हेवाट लावून मोकळी झाली होती. पण खून कधी लपत नाही. त्याप्रमाणे पोलीसांचे हात तिच्यापर्यंत पोहचलेच. या गुन्ह्यात ती व तिच्या इतर साथीदारासह ती गजाआड झाली. डोंबिवली मानपाडा येथे राहणारा प्रवीण पाटील हा ४ जून पासून बेपत्ता असल्याची तक्रार त्याची पत्नी लक्ष्मी हिने मानपाडा पोलीस ठाण्यात नोंदवली होती. बरेच दिवस उलटूनही प्रवीणचा शोध लागत नव्हता. सरूवता शोधाशोध करून ही प्रवीण पाटीलचा तपास लागत नव्हता. त्यामुळे पाटील यांचे कुटुंब चिंतेत पडले होते. परंतू प्रविणची पत्नी लक्ष्मीला पती बेपत्ता झाल्यामागे काहीच चिंता वाटत नव्हती. हे प्रविण पाटीलच्या कुटुंबियांच्या लक्षात आले. याबाबत प्रवीणच्या कुटुंबीयानी संशय व्यक्त करत त्यांनी कल्याण क्राइम ब्रांचकडे धाव घेतली. गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलीसांनाही लक्ष्मीचा संशय आला होता. म्हणून प्रकरणाचा तपास गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलीसांनी सुरू केला. क्राईम ब्रॅन्चच्या पथकाने लक्ष्मीच्या बारीकसारीक हालचालींवर लक्ष ठेवले होते. पती हरवल्यानंतर पत्नी अस्वस्थ होते. तिचे कशावरच लक्ष लागत नाही. पतीची चिंता तिला असह्य होते. असे असताना लक्ष्मीच्या चेहऱ्यावर चिंतेचा लवलेशही नव्हता. ती सामान्यपणे राहत होती. त्यामुळेच कल्याण क्राइम ब्रांचच्या पथकाचा लक्ष्मीवर संशय बळावला. पोलिसांनी तिची गोपनीय चौकशी सुरु केली असता चौकशी दरम्यान तिने खोटी माहिती दिल्याचे पोलिसांच्या लक्षात आले. लक्ष्मीचा रिक्षाचालक मित्र अरविंद उर्फ मारी रविंद्र राम याच्यावर पोलीसांनी लक्ष दिले तेंव्हा लक्ष्मी व अरविंदचे प्रेमप्रकरण सुरू असल्याचे पोलिसाना समजले. तसेच पती बेपत्ता होऊन ही लक्ष्मी रिक्षा चालवयास जात होती. त्यानंतर पोलिसांनी लागलीच तिच्या संपर्कात असलेल्या अरविंद उर्फ मारी रविंद्र राम आणि त्याचा मित्र सनी सागर याला चौकशीसाठी ताब्यात घेतले. तेंव्हाच या खूनाचे बिंग फुटले. आरोपींना पोलिसी खाक्या दाखवताच त्याने केलेल्या कृत्याची कबुली दिली. सुरुवातीला कानावर हात ठेवणारे हे संशयीत आरोपी पोपटासारखे बोलू लागले. त्यांनी खूनाचा घटनाक्रम पोलीसांना सांगितला. अरविंदचे लक्ष्मी दोघेही रिक्षाचालक आहेत. सततची भेट, हसी-मजाक, मस्करी यामुळे दोघांमधील दरी दुर झाली होती. दोघेही ऐकमेकांना आवडू लागले होते. आता हे दोघे व्यवसाय करण्यासाठी रिक्षा काढत नव्हते तर ऐकमेकांना भेटून शारीरिक भूक भागवायला भेटत होते. या दोघांची सर्चा सर्वत्र सुरू झाली होती. शारीरीक सुख ओरबाडून घ्यायची दोघांनाही चटक लागली होती याची कुणकुण लक्ष्मीचा पती प्रविणला लागली होती. या कारणावरून प्रवीण आणि लक्ष्मीमध्ये वाद होत होते. पुढे या दोघांमधील वाद विकोपास गेले. प्रवीणचा संशय वाढत गेला होता. प्रवीणने तिला रिक्षा बंद करून घरात लक्ष देण्याचा सल्ला दिला. परंतू लक्ष्मी त्याचे काहीएक ऐकण्यास तयार नव्हती. ती आता खूप पुढे निघून गेली होती. अरविंद कडून मिळणारे क्षणीक सुख तिला लाखमोलाचे वाटत होते. त्या सुखाचा विरह तिला सहन होणारा नव्हता. त्यामुळे ती प्रविणच्या तोंडाला तोंड देत होती. यामुळे वादाचा भडका उडत होता. या रोजच्या किरकिरीला लक्ष्मी कंटाळून गेली होती. तिने रडत-रडत आपली घरातील रडगाणे आपला प्रियकर अरविंदला सांगितले. यानंतर प्रविणचा कायमचा काटा काढण्याचा कट शिजला यात लक्ष्मी, अरविंद आणि अरविंदचा मित्र सनी यांनी सहभाग घेतला होता. २ जून रोजी रात्रीच्या सुमारास प्रवीण घरी असताना अरविंद आणि सनी घरी आले.या दोघांना बघून प्रविन अधिकच संतापला.त्यांनी प्रथम प्रविणची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. पण तो त्यांचे काहीएक ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. तेव्हा त्यांनी प्रवीणला लोखंडी रॉडने बेदम मारहाण केली. यात लक्ष्मी देखील सहभागी होती. तो आरडाओरडा करू लागला म्हणून तिघांनी त्याची गळा दाबून हत्या केली. त्यानंतर त्याचा मृतदेह रिक्षात टाकून बदलापूर-कर्जत रोडच्या शेजारी टाकून देऊन पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. संशय येऊ नये म्हणून लक्ष्मीने मानपाडा पोलीस ठाण्यात आपला पती प्रवीण बेपत्ता असल्याबाबत तक्रार देखील नोंदवली होती. मात्र प्रवीणच्या कुटुंबीयांनी लक्ष्मीवरच संशय व्यक्त करत कल्याण क्राइम ब्रांचकडे धाव घेतली व कल्याण क्राइम ब्रँचच्या पथकाने मोठ्या शिताफीने या प्रकरणाचा उलगडा केला. याप्रकरणी लक्ष्मी अरविंद आणि त्यांचा साथीदार सनी याला देखील अटक केल्याचे कल्याण क्राइम ब्रांच पोलीस निरीक्षक नितीन मगदूम यांनी सांगितले. मगदूम पुढे म्हणाले की, खून कधीच पचत नाही.खूनाला वाचा फुटतेच. मारेकर्यांनी घटनास्थळी कोणताही पुरावा ठेवला नसला तरी तपास अधिकारी व तपास पथकाची नजर चौफेर असते.त्या नजरेतून आरोपी कधीच सुटत नाहीत. आरोपीने केलेल्या कुकर्माची शिक्षा त्यांना होणारच यात दुमत नाही. परंतू क्षणीक लैंगिक सुख मिळवण्यासाठी एका निष्पाप व्यक्तीची हत्या करायची हे कसले सुख?

28 JUNE TO 04 JULY 2021 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 26/06/2021 9:18 PM Page 1



# आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा

**निलंगा/प्रतिनिधी**

जिल्हयाचे माजी पालकमंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांचा वाढदिवस जिल्हयात विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. आ. निलंगेकर यांनी वाढदिवसा निमित्त जिल्हयात ५१ हजार वृक्षारोपण करण्यात यावे असे आवाहन केले होते, त्यानुसार जिल्हयात विविध ठिकाणी वृक्षारोपणासह ग्रामदेवतास अभिषेक, रुग्णांना फळ वाटप व अन्नदान या सह विकास कामांचा शुभारंभ व उदघाटन असे कार्यक्रम घेण्यात आले.जिल्हयाचे माजी पालकमंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांच्या वाढदिवसा निमित्त निलंगा शहर व तालूक्यात विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. निलंग्याचे ग्रामदैवत निलकंठेश्र्वरास दुग्धाभिषेक तर सर्व धर्मीयांचे श्रध्दा स्थान असलेल्या दादापिर व पिरपाशा दर्ग्यास चादर चढवून आ. निलंगेकर यांच्या दिर्घायुशासाठी प्रार्थना करण्यात आली. त्याच बरोबर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयास पुष्प अर्पण करण्यात आले. यानंतर निलंगा येथे उपजिल्हा रुग्णाल्यात जि. प. उपाध्यक्षा सौ. भारतबाई साळूंके व



चेअरमन दगडू साळूंके यांच्या हस्ते तर पंचायत समिती सभापती राधाताई बिराजदार व उपसभापती सौ. अंजली बोंडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत रुग्णांना फळे वाटप करण्यात आले.

शहरासह तालूक्यातही प्रार्थमिक व उप आरोग्य केंद्र यासह जि.प. शाळांच्या परिसरात वृक्ष लागवड करण्यात आली. यावेळी जिल्हा संघटक सरचिटणीस तथा जि.प. सदस्य संजय दोरवे, तालूकाध्यक्ष शाहूराज थेटे, उपनगराध्यक्ष मनोज कोळ्ळे, शहराध्यक्ष ॲड विरभद्र स्वामी, माजी सभापती अजित माने, तानाजी बिराजदार, शरद पेठकर, रवि फुलारी, ईनानी आदींसह पदाधिकारी, लोकप्रतिनीधी यांची माठ्या संख्येने उपस्थिती होती. आ. निलंगेकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन निलंगा शहरातील भूमी अभिलेख कार्यालयाच्या संरक्षक भिंतीच्य कामाचा तर तालूक्यात विविध ठिकाणी पाणंद रस्त्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. माजी पालकमंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांच्या वाढदिवसा निमित्त लातूरचे ग्रामदैवत श्री सिध्देश्र्वर रत्नेश्वरास सतिष मिर्चे (काका) व शहर जिल्हा भाजपाच्या वतीने शहर जिल्हाध्यक्ष गुरुनाथ मगे यांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला. तसेच शहरातील गोशाळेत प्रेरना होनराव व सतिष मिर्चे (काका) यांच्या हस्ते गोमातांना चारा देण्यात आला. त्याच बरोबर जिल्हा रुग्णाल्यात रुग्णांसह त्यांच्या नातेवाईकांना अन्नदान करण्यात आले. यावेळी अभिजीत मुनाळे, बळवंत गायकवाड, प्रदिप दिक्षीत, रवी कांबळे, दत्ता पेटकर आदिंसह पदाधिकारी लोकप्रतिनिधी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थिती होत. जिल्हयातील विविध तालूक्यांमध्ये ५१ हजार वृक्ष लागवड उपक्रमा अंतर्गत लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकारी यांच्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात आली. कोरोना संकट काळत आरोग्य दुत म्हणुन कार्य करणाऱ्या आशा ताईंसह कोरोना योध्यांचा सन्मानही करण्यात आला. यावेळी बस्वराज मुस्तापूरे, संघटन सरचिटणीस मनिष बंडेवार, मनपा गटनेते ॲड शैलेश गोजमगुंडे, उपाध्यक्ष मनोज सुर्यवंशी, चिटणीस ङ दिग्विजय काथवटे यांच्यासह मंडल अध्यक्ष व पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहर भाजपाचे सुरेश राठोड यांच्या पुढाकारातून वृक्ष लागवड करण्यात आली. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष गुरुनाथ मगे, मिना भोसले, नगरसेवीका सौ. वर्षा कुलकर्णी, सौ. शोभा पाटील, सौ. श्र्वेता लोंढे, वामन राठोड, नितिन हासाळे, अशिष मुळे, संध्या जैन, प्रगती डोळसे, ज्याती रसाळ आदींची उपस्थिती होती.

# भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी माजी मंत्री विनायकराव पाटील यांची निवड



**अहमदपूर/फिरोज शेख**

भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश कार्यकारिणीची महत्त्वपुर्ण बैठकीत अहमदपूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार तथा माजी मंत्री विनायकराव पाटील यांची भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करण्यात आल्याची माहीती कळताच अहमदपूर मध्ये भाजपा कार्यकर्त्यांनी व सर्मथकांनी पेढे वाटून व फटाके फ ोडून एकच जल्लोस केला. माजी मंत्री विनायकराव पाटील यांनी अहमदपूर व चाकुर तालुक्यासह लातूर जिल्ह्यात केलेल्या कार्याची दखल घेऊन भारतीय जनता पक्षाने विनायकराव पाटील यांची प्रदेश उपाध्यक्षपदी निवड नुकतीच केली आहे. माजी मंत्री विनायकराव पाटील यांना प्रदेश उपाध्यक्षपदाच्या निवडीचे पत्र माजी मुख्यमंत्री तथा विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्रजी फडवणीस , प्रदेश अध्यक्ष माजी मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते प्रविणजी दरेकर, प्रदेश सरचिटणीस श्रीकांत भारतीय, माजी मंत्री आशिष शेलार, खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर, माजी मंत्री आ.सभांजीराव पाटील निलंगेकर, माजी आमदार सुधाकरराव भालेराव यांच्याऊपस्थिती मध्ये नियुक्ती करण्यात आली. माजी मंत्री विनायकराव पाटील यांची प्रदेश उपाध्यक्षपदी निवड झाल्याने खासदार सुधाकर श्रुंगारे, भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार रमेशअप्पा कराड, आमदार अभिमन्यू पवार, प्रदेश पॅनलिस्ट सदस्य गणेश हाके, माजी आमदार गोविंद केंद्रे, माजी आमदार बब्रुवानजी खंदाडे, माजी आमदार पाशा पटेल, प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर यांच्या सह लातूर जिल्ह्यातील भारतीय जनता पक्षाचे सर्व नेते पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी माजी मंत्री विनायकराव पाटील यांचे अभिनंदन केले असून अहमदपूर व चाकुर तालुक्यातील जनतेने फटाके फोडून, गुलालाची उधळण करत मोठा आनंदउत्सोव साजरा केला.

# नऊ मोबाईल व मोटारसायकलसह दीड लाखांचा मुद्देमाल जप्त



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर शहरातील विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी चोरीला गेलेले नऊ मोबाईल व एक मोटारसायकल असा सुमारे दीड लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. रोहित उर्फ टायगर विजय शिंदे (२०), तेजस धर्मपाल कांबळे (२१), रवी नामदेव आखाडे (१९) अशी अटक केलेल्याची नांवे आहेत. त्यांच्याकडे अधिक तपास करून मोबाईल चोरीचे तीन गुन्हे उघडकीस आणून ३६ हजारांचे मोबाईल हँडसेट जप्त करण्यात आली आहेत. तसेच विजापूर नाका पोलीस गुन्हे प्रकटीकरण पथकाने गर्दीच्या ठिकाणी मोबाईल चोरी करणारा व्यंकटेश नारायण पिटला (३५) यास अटक करून त्याच्याकडून ५ मोबाईल हँडसेट व एक मोटारसायकल असा एकूण १ लाख १७ हजारांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई सोलापूर पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, पोलीस उपायुक्त डॉ दिपाली धाटे, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ.प्रीती टिपरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील, पोलीस निरीक्षक अजय जगताप, सहाय्यक पोलीस निरीक्षक शितलकुमार कोल्हाळ, सहाय्यक फौजदार संजय मोरे, राजकुमार तोळणूरे, श्रीरंग खांडेकर, प्रकाश निकम, शिवानंद भीमदे आदींनी केली आहे.

# यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयात मायक्रोस्कोपचे अनावरण

**लातूर/प्रतिनिधी**

यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयातील कान-नाक-घसा शस्त्रक्रिया विभागात हाय डेफिनेशन प्रकारातील अत्याधुनिक मायक्रोस्कोप दाखल झाल्यामुळे कान व घशाच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अधिक गतीने व सुलभपणे करण्यास मदत होईल असे मत एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक तथा नेत्र तज्ज्ञ डॉ. हनुमंत कराड यांनी येथे व्यक्त केले. यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयातील कान-नाक-घासा विभागांतर्गतच्या शस्त्रक्रिया विभागात शुक्रवारी एच. डी. स्वरुपातील मायक्रोस्कोपचे अनावरण कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी अधिष्ठाता डॉ. एन. पी. जमादार, उपअधिष्ठाता डॉ. बी. एस. नागोबा, प्रशासकीय आणि शैक्षणीक संचालीका डॉ. सरिता मंत्री, रुग्णालय अधिक्षक एच. एच. जाधव, कान-नाक-घसा विभाग प्रमुख डॉ. श्याम सोमाणी, भुल विभाग प्रमुख डॉ. टी. के. कारंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. अत्याधुनिक स्वरुपातील मायक्रोस्कोपच्या उपलब्धतेमुळे कान-नाक-घसा विभागातील तज्ज्ञांना शस्त्रक्रिया करण्यासाठी मदत होणार असून या मायक्रोस्कोपला स्क्रीनची जोडणी असल्याने ते वैद्यकीय



शाखेच्या विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठीही उपयोगी पडणार असल्याचे सांगून पुढे बोलताना डॉ. हनुमंत कराड म्हणाले की, या मायक्रोस्कोपव्दारे गुंता-गुंतीच्या व जटील शस्त्रक्रिया करण्यास मदत होणार आहे. त्यामुळे यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयातील कान-नाक-घसा विभागातील तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत मायक्रोस्कोपव्दारे करण्यात येणाऱ्या शस्त्रक्रियांचा गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा असे ते म्हणाले. यावेळी बोलताना डॉ. श्याम सोमानी म्हणाले की, झाईस कंपनीव्दारे निर्मीत एच. डी. मायक्रोस्कोपच्या माध्यमातून कान व घशाच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया करता येणार आहेत. कान आणि घसा या संवेदनशिल अवयवातील शस्त्रक्रिया मायक्रोस्कोपमुळे सहजरित्या करता येतील. सबंधीत मायक्रोस्कोपला एच. डी. कॅमेऱ्याची जोडणी असल्याने शस्त्रक्रिया करीत असताना ती स्क्रिनवर दिसते व केलेली शस्त्रक्रिया रेकॉर्डही करता येते. या मायक्रोस्कोपव्दारे कानाची टिम्प्यानोप्लास्टी, एमआरएम, मायरिंगोटॉमी, मायरिंगोप्लास्टीसह आदी. तर घशातील मायक्रो लॅरिन्जर शस्त्रक्रियेसह सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया करता येतात असे डॉ. सोमाणी यांनी सांगीतले. यावेळी कान-नाक-घसा तज्ज्ञ डॉ. शैला बांगड, डॉ. गणेश कुलकर्णी, न्युरो सर्जन डॉ. भास्कर केंद्रे, भूल तज्ज्ञ डॉ. बी. बी. जाधव, डॉ. आर. पी. भोसले, डॉ. तेजस आठल्ये, सहअधिसेवक मारुती हत्ते, परिचारीका सारीका महामुनी, प्रिती भोकरे, प्रशांत बोराळे, दत्तात्र्य दुधभाते, सेवक रामदास शिंदे, लक्ष्मी पटणाघर हे उपस्थित होते.

# आजच्या स्त्रियांनी राजमाता जिजाऊंचा प्रयत्नवाद आत्मसात करावा -प्राचार्य केंद्रे

**लातूर/प्रतिनिधी**

राजमाता जिजाऊ या प्रयत्नवादी होत्या. शिवरायांवर आलेल्या संकटात जिजाऊंनी त्यांना मोलाचे मार्गदर्शन करून शिवरायांवर आलेल्या संकटांना दूर केले. आजच्या स्त्रियांनीही राजमाता जिजाऊंचा प्रयत्नवाद आत्मसात करून आपल्या लेकरांवर सुसंस्कार करुन उज्वल पिढी घडवावी, असे आवाहन राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे प्रमुख प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी केले. राष्ट्रमाता मॉ जिजाऊ यांच्या पुण्यतिथीनिमित्त गुरुवारी राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात जिजाऊंच्या प्रतिमेस प्राचार्य केंद्रे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, त्या प्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, राजमाता जिजाऊ संकटसमयी डगमगल्या नाहीत, त्या प्रयत्नवादी होत्या. शिवरायांना यश मिळावे यासाठी यज्ञ, तप, शांती, उपवास करीत बसल्या नाहीत. यश




मिळवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करावी लागते, यावर जिजाऊंचा दृढ विश्वास होता. शिवरायांवर चालून आलेल्या संकटांचा सामना करून त्यावर विजय मिळविण्यासाठी जिजाऊंनी शिवरायांना योग्य मार्गदर्शन केले. त्याच प्रकारे आजच्या स्त्रियांनीही आपल्या लेकरांना संकटातून दूर करण्यासाठी आणि विविध क्षेत्रात यश संपादन करण्यासाठी आपल्या लेकरांना प्रयत्नवादी बनवून, योग्य मार्गदर्शन करून लेकरांना ध्येयापर्यंत पोहोचविण्यासाठी जिजाऊंचा प्रयत्नवाद आत्मसात करावा, असे आवाहन त्यांनी केले. या प्रसंगी मदन धुमाळ, आर. डी. बिराजदार, सुधाकर लोकरे, सुनीता जवळे, अनुराधा पाटील, शोभा कांबळे, महेश मोटाडे, विवेक लोकरे, ए. बी. मुंडे, एस. एन. वाडीकर, आर. पी. मुंडे आदी उपस्थित होते.


# लोणार येथे गावगुंडांचा हैदोस; तीन मुलांसह चौघांवर प्राणघातक हल्ला!

## पोलीस प्रशासन संशयाच्या भोवऱ्यात

**बुलढाणा/प्रतिनिधी**

बुलढाणा जिल्ह्यातील लोणार तालुक्यातील तंबोला गावांमध्ये दुर्देवी घटना घडली असून पोलीस प्रशासन कोणत्याही प्रकारची कारवाई करीत नसल्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. लोणार जिल्ह्यातील तंबोला या गावांमध्ये ४ जून २०२१ रोजी एका कुटुंबावर गाव गुंडांनी हल्ला केल्याची घटना घडली. कुटुंबातील व्यक्तींना मारहाण करून घरातील ४ लाख रुपयांचे दागिने व पन्नास हजार रोख रक्कम लंपास केली. याबाबत पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली, मात्र पोलीस प्रशासन या गंभीर प्रकरणाकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत आहे. तंबोला गावामध्ये राहणारे विनोद चव्हाण (४०) यांच्या घरावर काही गावगुंडांनी अचानक हल्ला करून विनोद चव्हाण यांना लोखंडी रॉडने जबर मारहाण केली. त्यांच्याबरोबरच त्यांचा मुलगा अमन चव्हाण (१२), निशा चव्हाण (१६) आणि अंजली चव्हाण (१९) यांनाही मारहाण करण्यात आली. मारहाणीत विनोद चव्हाण यांच्या डोक्यात जबर दुखापत झाली असून ८ टाके पडेल. तर मुलगा अमन याच्या गुडघ्यालाही जबर मार लाडला असून दोन मुलींनाही मारहाण करण्यात आली. त्याचबरोबर त्या गावगुंडांनी





घरातील ४ लाखांचे दागिने व ५० हजार रोख रक्कम लंपास केली. विनोद चव्हाण यांना जबर मारहाण झाल्यामुळे त्यांना १० दिवस रुणालयात दाखल करण्यात आले होते. त्यानंतर विनोद चव्हाण यांना पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यासाठी गेले असता त्यांची साधी तक्रारही घेतली नाही. पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र पोपटराव देशमुख आणि पोलीस अधिकारी गजानन धोंडगे, विशाल धोंडगे यांनीही अजून त्या गावगुंडावर कारवाई केली नसल्यामुळे संताप व्यक्त होत आहे. त्यामुळे या गावगुंडाबरोबरच पोलिसांचेच साटेलोटे आहेत की काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

# भागवत घुटे खुन प्रकरणातील फरार आरोपी विकास हिंगे स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळयात

**लातूर/प्रतिनिधी**

मुरुड पोलीस ठाणे हद्दीतील सावरगाव शिवारात अनैतिक संबंधाच्या कारणावरून खूनाची घटना घडली होती. या प्रकरणात दोन आरोपींना पोलिसांनी अगोदरच अटक केली होती परंतु मुख्य आरोपी पोलिसांना हुलकावण्या देत होता. अखेर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाने फ रार आरोपीचा माग काढत त्याच्या मुस्क्या आवळत उत्कृष्ठ



कामगिरी केली आहे. दि. १७ मार्च २०२१ रोजी सावरगाव ते लातूर जाणाऱ्या रस्त्यावर महेश आनंदराव शिंदे यांच्या उसाच्या फडात औसा तालूक्यातील कवठा केज येथील रहिवाशी भागवत रंगराव घुटे त्याच्या मानेवर, नाड्यावर धारदार शस्त्राने वार करून गुप्तांग कापून मयताच्या तोंडात ठेवून मारेकऱ्यांनी अतिश्य क्रुर हत्या घडवुन आणली होती. मयताचा मुलगा किशोर भागवत घुटे यांच्या फिर्यादीवरून मुरुड पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ७९ /२०२१ कलम ३०२, २०१, ३४ भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास मुरुड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सुदर्शन ढोणे यांच्याकडे देण्यात आला होता. सपोनि सुदर्शन ढोण यांना या खून प्रकरणाचा तपास करून तीन आरोपी पैकी दोन आरोपीनां अटक केली होती. तर या प्रकरणातील प्रमुख आरोपी विकास हिंगे हा फ रार होता. तो सोलापूर, पुणे, मुंबई भागात पोलिसांची नजर चुकवून राहात होता. पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अपर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, उपविभागीय पोलिस अधिकारी, लातूर (ग्रामीण) प्रिया पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक गजानन भातलवंडे यांच्या नेतृत्वात विविध गंभीर गुन्ह्यात फरार असलेल्या गुन्हेगारांना अटक करण्याची मोहीम सुरू असून या मोहिमेमध्ये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार राजेंद्र टेकाळे, रामहरी भोसले, प्रकाश भोसले, बालाजी जाधव, सिद्धेश्र्वर जाधव, सुधीर कोळसुरे व पोलीस ठाणे मुरुड येथील पोलिसांचे एक पथक तयार करून फरार आरोपीचा शोध घेत असताना नमूद आरोपी हा त्याचे नातेवाईकांना भेटण्यासाठी आला आहे. अशी गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या टीमला मिळाल्यावरून विकास हिंगे यास वरील टीमने लातूर येथून ताब्यात घेतले व मुरुड पोलीसध्या ताब्यात देण्यात आले आहे. गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक ढोणे हे करीत आहेत.

# चोरींच्या दुचाकी विक्रीसाठी आले अन पोलिसांच्या तावडीत सापडले

**भिवंडी/आकाश गायकवाड**

अनलॉक काळात भिवंडी पोलीस परिमंडळ २ मध्ये दुचाकी चोरटयांनी धुमाकूळ घालत दिवसागणिक ४ ते ५ दुचाकी चोरीचे गुन्हे विविध पोलीस ठाण्यात दाखल असतानाच, चोरींच्या दुचाकी विक्री करण्यासाठी आलेल्या दोन चोरट्यांना कोनगांव पोलीसांनी मुंबई नाशिक महामार्गावर रांजणोली गावातील एका हॉटेल समोर सापळा रचत त्यांना अटक केली आहे. जुबेर अब्दुल वहाब मेमन (२६) सौद सिराज खान (२१) असे अटक केलेल्या सराईत चोरट्यांची नावे आहेत. कोनगांव पोलीस ठाण्याचे तपास पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक (गुन्हे) अभिजीत पाटील यांना गुप्त बातमीदारांने दिलेल्या माहितीच्या आधारे दुचाकी चोरी करणारे दोन चोरटे हे त्यांच्या ताब्यात चोरीच्या दुचाक्या मुंबई-नाशिक महामार्गावरील रांजणोली येथील बासुरी हॉटेलच्या जवळ विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलीस पथकाने या ठिकाणी सापळा लावून जुबेर आणि सौद या दोघांना एक दुचाकी व ऑटो रिक्षासह ताब्यात घेतले. या चोरट्याकडून कोनगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरीला गेलेली रिक्षा व शिळ डायघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरीला गेलेली दुचाकी असा ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून या चोरटयांनी आणखीही काही चोरीचे गुन्हे केल्याचा कयास पोलिसांनी व्यक्त केला आहे.